**पुढारी – दि. १४ फेब्रुवारी, २०२०**

# विमानाने येऊन घरफोड्या करणारा अट्टल चोरटा जेरबंद

- पुणे पोलिस युनिट पाचची कारवाई
- १२७ घरफोडीचे गुन्हे
- पुण्यातील ८२ घरफोड्यांचा समावेश
- पुण्यात येऊन स्थानिक मित्राच्या मदतीने घरफोडी
- चोरलेल्या ऐवजाची लावत होता हैदराबाद येथे विल्हेवाट
- इतरही राज्ये आणि जिल्ह्यांत गुन्हे दाखल



घरफोड्या करणारा अट्टल गुन्हेगार कुरेशी व त्याचे इतर साथीदार, जप्त करण्यात आलेला ऐवज. या वेळी उपस्थित अतिरिक्त पोलिस आयुक्त रवींद्र शिसवे, अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, गुन्हे शाखा युनिट पाचचे अधिकारी व कर्मचारी.

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कारागृहातून बाहेर पडल्यानंतर हैदराबाद येथून पुण्यात विमानाने येऊन घरफोड्या करणाऱ्या अट्टल चोरट्याला गुन्हे शाखेच्या युनिट पाचने अटक केली. त्याच्याकडून ३७ लाख ७३ हजार ६५० रुपयांचा चोरीचा ऐवज जप्त करण्यात आला. चोरलेल्या ऐवजाची विल्हेवाट लावणाऱ्या इतर चौघांनाही प्रकरणी अटक करण्यात आली, त्यांच्याकडील चौकशीत १२७ तर गुन्ह्यासह पुणे शहरातील ८२ गुन्हे उघडकीस आणण्यात पुणे पोलिसांना यश आले.

सलीम अली हुसेन खान ऊर्फ कुरेशी उर्फ मोहंमद हमीद हबीब कुरेशी (४६, रा. सेवन टॉवर रोड, टोली चौकी, हैदराबाद. मूळ रा. टाटानगर झोपडपट्टी, गोवंडी, मुंबई) असे अट्टल चोरट्याचे नाव आहे. त्याचा साथीदार ईश्वर उर्फ चिंट्या शिंदेवळ (रा. येरवडा, पुणे) यालाही अटक केली आहे. या दोघांसह चोरीचे साहित्य विकणारे शरीफ मोहंमद ख्वाजा मैनुद्दीन शेख, बिलाल उर्फ अशोक गोविंद प्रधान, अब्दुल सत्तार मोहंमद नजीर अहमद सत्तार, मोघल अन्वर अली करीम बेग, प्रभू कल्लाप्पा नंजवडे (सर्व रा. हैदराबाद) यांनादेखील याप्रकरणी अटक करण्यात आली.

पुणे, मुंबई, नाशिक नागपूर तसेच भारतातील इतर राज्यांतील शहरांत घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार कुरेशी हा मे २०१८ मध्ये येरवडा कारागृहातून शिक्षा भोगून बाहेर आला होता. त्यानंतर तो महाराष्ट्रातील विविध शहरात व इतर राज्यात विमानाने व कधी त्याच्याजवळील काळ्या लॅन्सर कारने येऊन घरफोड्या करून पोलिसांना गुंगारा देऊन पळून जात होता. त्याबाबत पुणे शहरातील काही ठिकाणचे सीसीटिव्ही फुटेज मिळाल्यानंतर तो त्याच्या गाडीतून विमानतळावर येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पथकातील सहायक पोलिस निरीक्षक तासगावकर, पोलिस उपनिरीक्षक शेंडगे तसेच इतर कर्मचाऱ्यांच्या मदतीने सापळा लावण्यात आला. याच दरम्यान विमानतळ येथील संजय पार्ककडे जाणाऱ्या रोडवर काळ्या रंगाची लॅन्सर कार फिरताना आढळली. त्यानंतर त्या कारचा पाठलाग करून पोलिसांनी त्याची गाडी कारला आडवी लावून थांबवली.

कारमधून चालकाला ताब्यात घेण्यात आले असता त्याच्या चौकशीत त्याने मूळचा हैदराबाद येथील असल्याचे सांगितले. तसेच पुणे शहर व परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी टेहळणी करून तो त्याच्याकडील साहित्य वापरून कमीत कमी वेळेत घरफोड्या करत होता. तसेच चोरीचा माल त्याच्या हस्तकामार्फत तो हैदराबाद येथे नेऊन विकत आहे. गुन्ह्याचा तपास करत असताना घरफोड्या करण्यासाठी तो पुण्यातील त्याचा साथीदार ईश्वर उर्फ चिंट्या शिंदेवळ याची मदत घेऊन त्याला हातात स्प्रे देऊन घरफोडीसाठी जाताना त्याला पहारा देण्यासाठी थांबवत होता. हैदराबाद येथे जाऊन गुन्ह्याचा अधिक तपास केला असता चोरीचा ऐवजाची विल्हेवाट लावणाऱ्या त्याच्या इतर साथीदारांनाही अटक करण्यात आली. त्यांच्याकडून ८३० ग्रॅम सोन्याचे दागिने, ६ किलो २७५ ग्रॅम चांदी असा ३७ लाख ९१ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. पुण्यातील ८२ गुन्ह्याव्यक्तीरिक्त त्याने नाशिक, नागपूर, मुंबई, नवी मुंबई, ठाणे व इतर राज्यातील ४५ गुन्ह्यांचा सहभाग आहे.

पुणे पोलिसांनी आतापर्यंत ४० गुन्ह्यातील माल हस्तगत केला असून उर्वरित गुन्ह्यातील ऐवज जप्त करायचा आहे. ही कारवाई अतिरिक्त पोलिस आयुक्त रवींद्र शिसवे, अप्पर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, पोलिस उपायुक्त बच्चन सिंह, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी पवार, विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट पाचचे प्रभारी अधिकारी वरिष्ठ पोलिस निरिक्षक दत्ता चव्हाण, सहायक पोलिस निरीक्षक संतोष तासगांवकर, पोलिस उपनिरीक्षक शेंडगे, पोलिस कर्मचारी संतोष मोहिते, प्रदीप सुर्वे, राजेश रणसिंग, दत्ता काटम, राजाभाऊ भोरडे, बंडू शिंदे, संजय देशमुख, अमजद पठाण, महेश वाघमारे, प्रविण काळभोर, अश्रुबा मोराळे, सचिन घोलप, दया शेगर, अंकुश जोगदंडे, स्नेहल जाधव, संजयकुमार दळवी यांनी ही कारवाई केली.

### आठवड्याला दोन घरफोड्यांचे टार्गेट

कुरेशीवर शहरातील ३१ पोलिस ठाण्यांपैकी २४ पोलिस ठाण्यात घरफोडीचे गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे. जून २०१८ मध्ये कारागृहामधून बाहेर आल्यानंतर त्याने १२७ घरफोड्या केल्याचे निष्पन्न झाले असून, त्याने आठवड्याला दोन घरफोड्या करण्याचे टार्गेट ठेवल्याचेही यावरून स्पष्ट होत आहे.

---

**लोकमत – दि. १९ फेब्रुवारी, २०२०**

# शौकासाठी महागडा कॅमेरा चोरणारा जाळ्यात

## फोटोग्राफीचा छंद : सीसीटीव्हीमुळे उलगडा

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : फोटोग्राफी करण्याचा, तसेच टिकटॉक व्हिडिओ बनविण्याचा त्याला शौक आहे. परंतु, तो महागडे कॅमेरे घेऊ शकत नव्हता. त्यामुळे श्रीमंतांच्या लग्न समारंभात जाऊन तेथे आलेल्या फोटोग्राफरचा कॅमेरा व साहित्य चोरण्याची कल्पना त्याच्या डोक्यात आली. त्याप्रमाणे त्याने हडपसर येथील लक्ष्मी लॉन्समध्ये जाऊन १ लाख रुपयांचा कॅमेरा व साहित्याची बॅग चोरुन नेली. हडपसर पोलिसांनी मात्र त्याला हातात बेड्या घातल्या.

प्रतीक गव्हाणे (वय १९) असे या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी महेश पवार यांनी फिर्याद दिली आहे. महेश पवार हे व्यावसायिक फोटोग्राफर आहेत. १४ फेब्रुवारीला ते लक्ष्मी लॉन्स येथे लग्नाचे शुटिंग करीत असताना त्यांची एक कॅमेऱ्याची बॅग चोरीला गेली होती. लग्नाच्या गडबडीत कोणी तरी चुकून नेली असावी, असे त्यांना वाटले. दोन दिवस चौकशी केल्यावरही ती न मिळाल्याने शेवटी त्यांनी हडपसर पोलिसांकडे तक्रार दिली.

- पोलिसांनी लक्ष्मी लॉन्समधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली. तेव्हा त्यांना एक तरुण बॅग घेऊन जाताना दिसला. पोलिसांनी माहिती काढून प्रतीक गव्हाणेला ताब्यात घेतले. चौकशी केल्यावर त्याने आपण शौक पूर्ण करण्यासाठी बॅग चोरल्याची कबुली दिली.
- चोरीच्या उद्देशाने तो मगरपट्टा येथील लक्ष्मी लॉन्समध्ये चांगले कपडे घालून गेला. भोजनावर ताव मारला. फोटोग्राफर साहित्य कोठे ठेवतो, हे पाहून ठेवले. फोटोग्राफर वधुवर यांच्या जेवणाचे फोटो घेत होते. त्यावेळी त्यांची बॅग पळवली.

पोलिसांची चोरी केलेल्या सर्व सामानाची बॅग हस्तगत केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश साठे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक प्रसाद लोणारे, रमेश साबळे, अनिल कुसाळकर, विजय पवार, ज्ञानेश्वर चित्ते व प्रशांत नरसाळे यांनी ही कामगिरी केली.

TIMES OF INDIA - 11 February, 2020

# Criminal, aide held for stealing garments from three stores

Times News Network

Pune: A criminal on police records and his accomplice were arrested last week for stealing garments from three shops posing as customers.

The criminal, Jayesh Kacchi (32), and Milind Karande (25), both from Keshavnagar in Mundhwa, would remain in police custody remand till Tuesday. They were arrested on February 5.

"We have seized garments valued at Rs1,08,950 stolen from a shop at Tilekagar in January and two stores in Saibabanagar and Gokulnagar in 2019, and a motorcycle used in the crime," said assistant inspector Chetan More from the Kondhwa police.



A CCTV grab of the suspects

Police had received a CCTV footage in connection with the theft at the shop in Tilekagar, capturing the images of the duo travelling with a garments' bundle on a motorcycle.

More said, "We established the routes used by the suspects by checking CCTV cameras up to a distance of 20km between various parts of Kondhwa and Keshavnagar. An informer helped us in locating the suspects."

He said, "Investigations revealed that Kacchi used to visit the newly opened shops for purchasing garments for marriage and his accomplice would wait outside on a bike. Kacchi purchased garments in bulk. At the time of paying the bill, he would divert the shop owner's attention. He would then pick up the cloth bundle and flee."

**TIMES OF INDIA - 19 February, 2020**

# Youth steals camera, lenses from marriage venue, held

Times News Network

**Pune:** A 19-year-old youth from Mundhwa was arrested on Monday on the charge of stealing a bag containing a high-end camera and lenses worth Rs 80,000 from a marriage venue in Hadapsar on February 14.

One of the photographers hired to cover the wedding, Mahesh Pawar, had lodged an FIR with the Hadapsar police on February 16.

Assistant inspector Prasad Lonare said the arrested youth was unemployed. "His father runs a roadside stall in Mundhwa.

The youth is fond of photography and also loved to share videos on social networking sites," Lonare said, adding, "To that extent, he would borrow a camera or a smartphone from his friends to fulfil his desire to shoot his videos or photographs."

The officer said the youth knew that he couldn't afford to buy a high-end camera or a smartphone.

"He was also aware of the fact that it was not easy to steal it from shops. So, he hatched a plan and decided to steal a camera from a marriage venue as it was comparatively easy," Lonare said.

## A PENCHANT FOR PHOTOGRAPHY

He carried out a recce of the marriage hall where more than four photographers were assigned for the job.

On the night of the wedding, he entered the venue dressed smartly and had dinner there.

After dinner, when the bride and groom's photoshoot began, one of the photographers hired for the event kept his bag aside. The youth picked it up and walked out. "No one at the function suspected him," Lonare said.

After the function was over, the photographer, Pawar, realised that one of the bags was missing. "He first thought that the other photographers might have taken it. When the bag could still not be traced, he checked with everyone before lodging the FIR," Lonare said.

CCTV installed at the venue recorded the youth walking out of the marriage hall with the camera bag in his hand. After the footage was handed over to the invstigating team, the youth was identified. "We traced him on Monday and arrested him," Lonare added.

**TIMES OF INDIA - 21 February, 2020**

# Police seize stolen car from duo in custody

Times News Network

**Pune:** The Kondhwa police seized the stolen car from two youths on Thursday, two days after they were arrested for threatening its driver with sharp weapons and stealing it on NIBM-Undri Road.

The Two men had threatened the car driver with sharp weapons and stole his vehicle, as well as some cash, just after he had got a flat tyre repaired near a hotel on the NIBM-Undri Road around 10.30pm on Monday.

Using CCTV footage, the Kondhwa police had arrested Vishal Avhad (19), a criminal on record, and his friend, Sharukh Khan (25), both residents of Krishnanagar.

During questioning, the police said, Avhad and Khan admitted that they had threatened the driver, Akshay Khude (25) from Yeolewadi, with the weapons and stolen the car. They had also robbing him of some cash.

Assistant inspector Chetan More from the Kondhwa police said, "We have seized the car parked by the suspects in a jungle at Mohammadwadi in Kondhwa. We also recovered Rs300 belonging to the driver and the knife the duo had used to threaten him with dire consequences."

More said, "Avhad and Khan told the police that they had also stolen three vehicles from various places in Kondhwa. We seized an autorickshaw and two motorcycles they had left in the jungle. They used tp steal vehicles to earn some quick money."

On Monday evening, the car owner was on her way to Corianthans Club at Mohammadwadi to attend her daughter's marriage ceremony when her vehicle got a puncture. She parked the car near a restaurant around 7.30pm and called up Khude, her part-time driver, asking him to repair the puncture. She proceeded for the ceremony in an autorickshaw.

When Khude came to the spot and got the tyre repaired, he was accosied by the duo. They snatched his cash and the car keys. One of them started the car and told Khude to sit next to him. When the car reached near Corianthans Club, Khude applied the hand brake, stepped out of the car and raised an alarm. The robber, however, released the brake, got his accomplice to sit in the car and sped off from the spot.

TIMES OF INDIA - 14 February, 2020

# Science grad arrested for fraudulent withdrawal of ₹1.4 lakh from ATMs

Gitesh.Shelke
@timesgroup.com

**Pune:** An unemployed science graduate from Allahabad was arrested last week for using his and his relatives' ATM cards for withdrawing Rs1.4 lakh through 14 transactions. But, the withdrawn amount was not debited from the accounts because of his "pin trick".

A team of the cybercrime police zeroed in on Satyavruta Kaushalprasad Dwivedi (23) on Friday in Allahabad. He made cash withdrawals of Rs10,000 each from 14 ATMs of different banks before he ran out of luck.

Dwivedi would put a safety pin in the cash dispenser of the ATM at the time of collecting cash, resulting in an "incomplete transaction" signal going to the bank. The bank would then revert the "incomplete transaction" amount to the account holder despite Dwivedi collecting the cash from the ATM.

Senior inspector Rajkumar Wakchaure of the Cybercrime police station said Dwivedi would travel to the city and stay in hotels. He targeted ATMs in Baner, Sangvi, Shivajinagar, Pimpri and Chinchwad over the past few days.

The officials of a bank spotted Dwivedi lingering in an ATM kiosk in Baner for a long time. The CCTV footage of the ATM showed him buying time inside the kiosk and the bank concerned receiving an "incomplete transaction" signal at the same time.

The officials reported the incident to the Cybercrime police station. The police then studied the CCTV footage and tracked down the details of the bank accounts, leading to the arrest of Dwivedi.

Wakchaure said Dwivedi was a graduate and had a good friends' circle in Allahabad. "His friends would insert a small pin before the flap of the cash dispensing tray of the ATM unit before it completely shut down. This would send a signal to the bank concerned that the transaction was not completed, and the amount withdrawn would be reverted to the account holder."

Dwivedi used the same trick to withdraw cash from some ATMs in Allahabad first. Then he decided to replicate the act in other places.

"Dwivedi always withdrew Rs10,000, which a normal person withdraws from an ATM unit," Wakchaure said.

## PIN TRICK

- Satyavruta Dwivedi would visit the ATM kiosks in the afternoon or late in the night
- Dwivedi carried a plastic or iron safety pin with him
- He used to insert the pin in the cash dispensing unit of the machine when currency notes popped out



- Dwivedi kept the pin in the cash dispensing unit for 30 to 40 seconds after taking out the cash
- The bank used to restore the amount to the account to which the ATM card was linked after the system generated the message "error in the transaction"

**14 CARDS RECOVERED**

- 14 ATM cards seized from Dwivedi
- They belonged to him and his relatives

**पुढारी** – दि. १४ फेब्रुवारी, २०२०

# शेजारीणच निघाली चोर!

## मैत्रिणीच्या मदतीने दागिने, पैशांवर डल्ला



- बाहेरगावी जाताना चावी ठेवणे पडले महागात
- 'सीसीटीव्ही'ने फोडले बिंग
- फातिमानगरमधील घटना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

घरात वारंवार होत असलेल्या चोरीमुळे हैराण झालेल्या महिलेने घरात सीसीटीव्ही कॅमेरे लावल्यामुळे चोरीचे भिंग फुटले. शेजारी राहणाऱ्या महिलेनेच तिच्या मैत्रिणीच्या मदतीने घरफोडीचा हा प्रकार केल्याचे उघड झाले. याप्रकरणी शेजारच्या महिलेसह दोघींना वानवडी पोलिसांनी अटक केले. भारती आस्वानी (५३, रा. इशा टॉवर, फातिमानगर, वानवडी) आणि खंडागळे (५९, रा. लक्ष्मी प्लाझा, केशवनगर, मांजरी) अशी त्यांची नावे आहेत.

याबाबत सपना शाह (३८, रा. वानवडी) यांनी वानवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शाह यांच्या घरात वारंवार चोरीचे प्रकार घडत होते. चोरीचे हे सत्र जून २०१८ पासून सुरू होते. यामध्ये शाह यांच्या घरातील ७ लाख ४२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. सपना शहा आणि भारती आस्वानी या फातिमानगर येथील इशा टॉवरमध्ये पहिल्या मजल्यावर समोरासमोर राहण्यास आहेत.

शाह यांचा फ्लॅट १०७ क्रमांकाचा तर आस्वानी हिचा फ्लॅट १०४ नंबरचा होता. शाह यांना कुठे बाहेर जायचे झाल्यास त्या घराची चावी आस्वानी यांच्याकडे विश्वासाने ठेवण्यासाठी देत असत. परंतु, बऱ्याच वेळा त्यांच्या घरातून दागिने, रोख रक्कम चोरीला जात होती, परंतु चोरीचा नेमका प्रकार त्यांच्या लक्षात येत नव्हता. त्यामुळे शाह यांनी कंटाळून त्यांच्या घरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेतले. त्या सीसीटीव्ही कॅमेरांचे चित्रीकरण हे त्यांना त्यांच्या मोबाईलवर दिसण्याची सुविधा त्यांनी करून घेतली. दोन दिवसांपूर्वी शाह आणि त्यांचे कुटुंबीय मुंबई येथे गेले असताना आस्वानी आणि तिची मैत्रीण खंडागळे यांनी याच संधीचा फायदा घेत अगोदरच बनवून घेतलेल्या बनावट चावीने फिर्यादींच्या सदनिकचे कुलूप उघडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटात ठेवलेले दागिने आणि रोख रक्कम चोरताना आस्वानी आणि तिची मैत्रीण सीसीटीव्हीत कैद झाल्या.

मुंबई येथे असताना शाह यांना त्यांच्या मोबाईलवर ही चोरीची घटना दिसली. त्यानंतर पुण्यात परतल्यानंतर त्यांनी वानवडी पोलिस ठाण्यात धाव घेऊन याबाबत फिर्याद दिली. भारती आस्वानी आणि खंडागळे हिच्याकडे पोलिसांनी चौकशी केल्यानंतर त्यांनीच यापूर्वीही दागिने चोरल्याचे सांगितले. त्यांनी काही दागिने विकून पैसे स्वतः साठी वापरून नातेवाईकांना दिले असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

यापूर्वी शाह यांनी आस्वानी हिच्याकडे चावी ठेवण्यासाठी दिली होती. त्यावेळी डुप्लीकेट चावी बनवून ठेवल्याचेही तपासात उघड झाले. याप्रकरणी दोघींवर गुन्हा दाखल करून व अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. सरकारी वकील क्रांती कुलकर्णी यांनी पोलिस कोठडीची मागणी केली. दोघींना न्यायालयाने दोन दिवस पोलिस कोठडी सुनावली आहे. सहायक पोलिस निरीक्षक आसाराम शेट तपास करत आहेत.

**लोकमत** – दि. ६ फेब्रुवारी, २०२०

# शस्त्राचा धाक दाखवून चारचाकी चोरणाऱ्यास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'गाडी भाड्याने हवी आहे,' असे सांगून गाडीमालकाला शस्त्राचा धाक दाखवून चारचाकी व मोबाईल चोरणाऱ्या सराइताला दत्तवाडी पोलिसांनी अटक केली. सुनील लक्ष्मण गवळी (रा. साई बिल्डिंग, विठाईनगर, धायरी गाव) असे त्याचे नाव आहे. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. याबाबत इस्माईल इब्राहिम शेख (वय ४४, रा. दत्तवाडी) यांनी फिर्याद दिली आहे.

ही घटना १६ जानेवारी रोजी पानशेत रस्त्यावर घडली. सुनील याने इस्माईल यांना कॉल करून चारचाकी गाडी भाड्याने हवी असल्याचे सांगितले. यासाठी त्याने इस्माईल यांना सिंहगड रस्त्यावरील दांडेकर पूल परिसरात बोलावून घेतले. त्यानंतर ते दोघेही एकाच गाडीतून पानशेत रस्त्यावर आले. या वेळी, सुनील याने शस्त्राचा धाक दाखवून इस्माईल यांना जबरदस्तीने गाडीतून उतरवून त्यांची चारचाकी, मोबाईल व १० हजारांची रोकड घेऊन गेल्याचे फिर्यादित नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी त्याला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले.



सुनील याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्या ताब्यातून चारचाकी जप्त करण्यात आली आहे. सुनीलने चोरी केलेला मोबाईल फोन हा गोवा येथील एका व्यक्तीकडे ठेवला आहे. तो जप्त करायचा आहे. आरोपी हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून गुन्ह्यात वापरलेल्या शस्त्राबद्दल तो उडवाउडवीचे उत्तरे देत आहे.

त्याअनुषंगाने तपास करायचा असल्याने सहायक सरकारी वकील सुरेखा क्षीरसागर यांनी आरोपीच्या पोलीस कोठडीची मागणी केली. ती न्यायालयाने मान्य केली.

Complaints Soar To 80 | KYC Update Costs Man

# Cops trace UPI fraud racket links to Bengal

Gitesh.Shelke@timesgroup.com

**Pune:** A preliminary probe by the cybercrime police has revealed that the suspects behind the latest online fraud misusing UPI app on cellphones are operating their racket from Kolkata and its adjoining areas in West Bengal.

"The numbers from which the encrypted link was sent to the victims for siphoning off their mone, are found to be from Kolkata and its surrounding areas," cybercrime inspector Jayram Paygude told **TOI** on Wednesday.

"We are now verifying the money trail to establish how funds from the UPI app on the cellphones of the victims were transferred and to which UPI apps and bank accounts were linked to the apps," Paygude said. The identification of the bank accounts linked to the UPI apps of the suspects would help the police to trace the culprits, he added.

The investigators, however, pointed out that the process was expected to take some time.

Meanwhile, the number of complaints related to the fraud received by the cybercrime police since February 15 has gone up to 80. On Wednesday, the police received 16 complaints.

"The quantum of the complaints rose suddenly from Febraury 15, when we received 11 plaints in a day, followed by 13 on February 16, 17 on Monday and 22 complaints on Tuesday. Since January 1, we were getting on an average a complaint per day. We expect that more people will approach us in next couple of days," Paygude said.

"We will get the details of the phone number. We suspect the culprits might be operating their UPI app on the same device on which the money was transferred," he added.

The police said all the complainants had received a common text message, stating 'Dear Pytm customer, your Pytm KYC has been suspended. Call Pytm office PH 98XXXXX998. Your account will be block within 24 hrs. Thank you. Pytm team." The text message also included an encrypted link.

Paygude said the UPI app company had not sent these messages to the customers. "People thought that the link was shared in the text message to update the KYC (Know Your Customer) formalities and click on it," he said.

According to police, cybercrime fraudsters create mirror image of the cellphones on which the software gets downloaded after the victim clicks on the link. "In such cases, the victims usually do not share their credentials in the text message or make a call on the number provided in the message. But due to the mirror image of the cell phone and manage to siphon off the money from the customers' account by gaining access to the device," said Paygude.

## CROOKS' TRICKS



In 2019, the city police received **300** complaints of people downloading links sent to them by strangers on their cellphones & being duped

- The fraudsters send SMSs to random phone numbers, promising a reward for downloading a link
- Once the link is downloaded, the fraudsters gain remote access to the targets' devices
- The targets do not realize their devices being accessed by somebody
- Four to five types of software are available on the internet, which create the mirror images of e-devices, such as laptops, cellphones and desktops, connected to the internet
- The fraudsters use these software to create the mirror images of their targets' electronic devices
- They then transfer money from the targets' UPI-linked bank account to another bank account
- They also make online purchases on various e-commerce websites
- Complaints with the cybercrime police reveal that the targets have been cheated in between ₹4,000 and ₹2 lakh after they clicked on the suspicious links shared through the text messages

---





अटक आरोपीसह विश्रामबाग पोलिसांचे पथक.

# दुचाकी चोरट्याला अटक; सात दुचाकी हस्तगत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विश्रामबाग पोलिसांनी एका दुचाकी चोरट्याला अटक केली असून, त्याच्या ताब्यातून १ लाख ३५ हजारांच्या सात दुचाकी हस्तगत केल्या आहेत. विजय रमेशराव शेंडे (वय. ३२, रा. मूळ वरोरा, चंद्रपुर, सध्या सहजपूर ता. दौंड ) असे अटक केलेल्या या चोरट्याचे नाव आहे. हॅण्डल लॉक नसलेल्या दुचाकी हेरून तो ढकलत चावीवाल्याकडे घेऊन जात असे, त्यानंतर जर चावी तयार करणाऱ्याला संशय आला तर तो चक्क बायको सोबत भांडण झाले असून, तीने गाडीची चावी घेतली असल्याची बतावणी करत होता. मात्र त्याचा हा बनाव जास्त दिवस टिकला नाही.

विश्रामबाग पोलिस ठाण्याचे एक पथक गस्तीवर असताना कर्मचारी बाबा दांगडे व प्रशांत शिंदे यांना आरोपी शेंडे याच्याकडे चोरीची दुचाकी असून, सध्या तो पुना बेकरीजवळ थांबला आहे, अशी माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून आरोपीला दुचाकीसह ताब्यात घेतले. त्यावेळी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, तो मुळचा चंद्रपूर जिल्ह्यातील असून, सहजपूर ता. दौंड येथील एका खासगी कंपनीत नोकरी करत असल्याचे समोर आले. मागील एक वर्षापासून तो शहरात येऊन हॅण्डल लॉक नसलेल्या गाड्यांची चोरी करत होता. अशाप्रकारने त्याने शहरातून सात दुचाकी चोरी केल्या असल्याचे पोलिस तपासातून समोर आलं आहे.

चोरी केलेल्या दुचाकी तो स्वतः वापरत असे व वाहन नसलेल्या कर्मचाऱ्यांना देखील वापरण्यास देत होता. यावेळी विश्रामबाग, फरासखाना, डेक्कन व विश्रांतवाडी पोलिस ठाण्यातील वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. ही कामगिरी पोलिस उपायुक्त स्वप्ना गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विजय जाधव, समाधान कदम, कर्मचारी नाईक बाबा दांडगे, विठ्ठल खिलारे,प्रशांत शिंदे, विनोद ओंबासे यांनी केली.

TIMES OF INDIA - 11 February, 2020

# Criminal, aide arrested for bid to steal ATM cash

Asseem Shaikh
@timesgroup.com







(Clockwise from top) The ATM in Yeolewadi; the two suspects Rameshwar Baliram Deshmukh & Shriram Vikas Hanvate

**Pune:** A timely response to an alert relayed by the police control room foiled an attempted heist at an ATM of a nationalised bank in Yeolewadi in the early hours of Sunday.

The Kondhwa police had received a call from the control room around 2.50am in this regard. The call specified that some men were in the process of stealing money from the cash dispensing unit of an unmanned ATM kiosk at Digamber House near Sinhagad College.

Responding to the alert, a night patrol police team from the nearby Khadi Machine chowkey rushed to the spot and nabbed the two men inside the ATM kiosk.

The bank's Kondhwa branch manager, Rakesh Nagendranath Sahay, was informed of the attempted theft at 10am on Monday, following which he filed an FIR with the Kondhwa police.

"The duo — Shriram Vikas Hanvate (26) and Rameshwar Baliram Deshmukh (24) — are from Parali taluka of Beed district. While Hanvate is a criminal on the records of Pimpri Chinchwad police, Deshmukh has no criminal history," the FIR stated.

"By the time the night patrol team reached the spot, the duo had managed to remove the cash box's cover, snapped the cash dispensing unit wire and damaged the smoke alarm installed inside the kiosk. They, however, failed to steal the cash," the FIR further read.

The branch manager said the police had recovered a grinder machine, screwdriver, crowbar, wire cutter, spanner, hacksaw and a motorcycle from the possession of Hanvate and Deshmukh.

"The ATM unit did not have an armed security guard or an emergency alarm. A CCTV camera installed in the kiosk captured the images of the duo, while they were breaking the cash dispensing unit. Investigations revealed that Hanvate and Deshmukh targeted the machine as they were well-versed with the area. Hanvate had earlier worked for a private firm in Khadi Machine Chowk," said assistant inspector Chetan More from the Kondhwa police.

Sub-inspector and investigating officer Santosh Shinde said the duo decided to steal cash from the ATM as Hanvate was in dire need of money. "He roped in Deshmukh, who had come to Pune only last week. They decided to break into the kiosk in the wee hours of Sunday to escape detection," Shinde said.

"We are questioning the duo to find out if they had visited the spot earlier. We are also trying to ascertain if they had sought help from someone else. Investigations are on to establish if they had targeted any ATMs in the city earlier," Shinde added.

The Pune Cantonment court on Monday sent the duo in police custody remand till February 12.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २३ फेब्रुवारी, २०२०

# शेवटच्या 'कॉल'मुळे लागला खुनाचा छडा

Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaMT




**पुणे :** भवानी पेठेतील इस्टेट एजंटचा खून झाल्यावर त्याचा मृतदेह हल्लेखोरांनी भोर येथील नाणेदांग जंगलात टाकला होता. तो सापडल्यावर पुणे ग्रामीण पोलिसांकडे कोणताही पुरावा नव्हता. पोलिसांनी इस्टेट एजंटला आलेले फोन क्रमांक तपासले. शेवटच्या वेळी आलेला फोन एका सराईताचा होता. त्याची माहिती घेतल्यावर तोदेखील गायब असल्याचे आढले. त्यामुळे खून त्यानेच केल्याचा संशय पक्का झाला. शोध घेऊन त्याला अटक केल्यावर साथीदाराच्या मदतीने ४० लाखांच्या खंडणीसाठी त्याने खून केल्याचे समोर आले.

इस्टेट एजंट रिकबचंद रायचंद ओसवाल (वय ७०, रा. शांतीनगर सोसायटी, महात्मा फुले पेठ) हे १० जानेवारी २०१९पासून बेपत्ता झाले होते. या प्रकरणी त्यांच्या कुटुंबीयांनी खडक पोलिस ठाण्यात 'मिसिंग'ची तक्रार दाखल केली होती. खडक पोलिस त्यांचा 'फोन लोकेशन'वरून शोध घेत होते; पण, त्यांचे शेवटचे लोकेशन स्वारगेट परिसरात बंद झाले होते. त्यानंतर दोन दिवसांनी भोर येथील नाणेदांड जंगलात एका व्यक्तीचा मृतदेह नागरिकांना आढळून आला. त्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केल्यावर तो ओसवाल यांचा असल्याचे समजले. डोक्यात कठीण वस्तूने वार करून खून केला होता. ग्रामीण पोलिसांनी तपास करताना ओसवाल यांना शेवटच्या दिवशी आलेल्या फोन क्रमांकाची यादी काढली. त्यामध्ये एक क्रमांक महेंद्र शांताराम बोडके (रा. धनकवडी) याचा असल्याचे दिसले. तो 'रेकॉर्ड'वरील आरोपी असल्याचे आढळले. पोलिसांनी बोडकेचा शोध घेण्यास सुरुवात केली. ओसवाल बेपत्ता झाल्यापासून तोदेखील गायब असल्याचे दिसून आले. त्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने बोडकेचा शोध घेऊन ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने अजय प्रदीप बारमुखच्या (रा. इंदिरानगर, भोसरी) मदतीने ४० लाख रुपयांच्या खंडणीसाठी खून केल्याचे सांगितले. त्यामुळे दोघांना अटक करण्यात आली.

आरोपी बोडकेची ओसवाल यांच्याशी अडीच वर्षांपासून ओळख होती. 'मुंबईवरून एक पार्टी आली असून, त्यांना जुना वाडा खरेदी करायचा आहे. त्या संदर्भात माझ्या ऑफिसवर या,' असे म्हणून ओसवाल यांना आरोपीने बोलविले होते. त्यानंतर त्यांना नटराज हॉटेलजवळून एका गाडी बसवून आंबेगाव येथील फ्लॅटवर घेऊन गेले. तेथे आरोपींनी त्यांच्याकडे ४० लाखांच्या खंडणीची मागणी केली; पण, एवढी रक्कम नसल्याचे सांगून त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्या वेळी आरोपींनी ओसवाल यांना मारहाण केली. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला होता.



## कॅबमधून नेला मृतदेह

आंबेगाव बुद्रुक येथील फ्लॅटमध्ये आरोपींनी ओसवाल यांचा खून केल्यानंतर दिवसभर मृतदेह पोत्यामध्ये लपवून ठेवला. संध्याकाळी आरोपींनी मांढरदेवीला जाण्यासाठी ऑनलाइन कॅब बुक केली. कॅबच्या डिक्कीत मृतदेह ठेवला. चालकाने त्याबाबत विचारल्यावर पोत्यात जुने सामान असून, ते घाटात टाकायचे आहे, असे आरोपींनी सांगितले. मांढरदेवीला जाताना आरोपींनी नाणेदांग घाटात कॅब थांबविली आणि जंगलात मृतदेह फेकून दिला होता.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २६ फेब्रुवारी, २०२०

# बलात्कार करून खून करणाऱ्याला जन्मठेप

## चार वर्षीय मुलीचा गळा चिरून मृतदेह ठेवला पोत्यात

म. टा. प्रतिनिधी, पुणे

चार वर्षीय चिमुकलीवर बलात्कार करून नंतर चाकूने गळा चिरून तिचा खून करणाऱ्याला नराधमाला जन्मठेप आणि नऊ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एम. देशपांडे यांच्या कोर्टाने निकाल दिला.

अजय ऊर्फ दशरथ अर्जुन (वय ३१ रा. करंडे, ता. माळशिरस, जि. सोलापूर) असे आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी चार वर्षीय मुलीच्या वडिलांनी तळेगाव दाभाडे पोलिसात फिर्याद दाखल केली होती. या खटल्याचे कामकाज सरकारी वकील पुष्कर सप्रे यांनी पाहिले. त्यांनी या प्रकरणात अकरा साक्षीदार तपासले. तळेगाव दाभाडे पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक अजय चौधरी यांनी या प्रकरणाचा तपास केला. न्यायालयीन कामकाजात पोलिस कॉन्स्टेबल नितीन पवार यांनी मदत केली.

फिर्यादींची मुलगी २६ जुलै २०११पासून बेपत्ता झाली होती. दुसऱ्या दिवशी मुलगी हरवल्याची तक्रार पोलिसांकडे देण्यात आली. २९ जुलै रोजी तळेगाव दाभाडे येथील मृत मुलीच्या चाळीबाहेर एका परासमोर

गर्दी दिसली. ती खोली चार दिवसांपासून बंद असून, त्यातून वास येत असल्याची चर्चा होती. तेथे राहणारा अजय निघून गेला होता. त्यानंतर नागरिकांनी ही घटना पोलिसांना कळविली.

पोलिसांनी त्या खोलीची तपासणी केल्यानंतर फिर्यादीच्या मुलीचा मृतदेह पोत्यात आढळून आला. तपासादरम्यान मुलीवर बलात्कार करून खून केल्याचे निष्पन्न झाले. पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने आरोपीने मृतदेह पोत्यात ठेवला होता. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करून दोषारोपपत्र दाखल केले.

आरोपीने केलेले कृत्य ही दुर्मिळातील दुर्मीळ घटना आहे; तसेच आरोपीला आपण केलेल्या कृत्याचा कोणताही पश्चाताप नाही, आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी सरकारी वकील पुष्कर सप्रे यांनी केली होती. कोर्टाने या प्रकरणी आरोपीला भारतीय दंड संहिता कलम ३०२ नुसार जन्मठेप आणि पाच हजार रुपये दंड; तसेच ३७६ (बलात्कार) नुसार दहा वर्षे सक्तमजुरी आणि तीन हजार रुपये दंड, २०१ (पुरावा नष्ट करणे) नुसार तीन वर्षे सक्तमजुरी आणि एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

## 'निकालाविरुद्ध हायकोर्टात अपील करणार'

या प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी कोर्टात करण्यात आली होती. आरोपीला कोर्टाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या शिक्षेविरुद्ध सरकार पक्षातर्फे मुंबई हायकोर्टात अपील करणार असल्याचे सरकारी वकील पुष्कर सप्रे यांनी सांगितले.

पुढारी – दि. १३ फेब्रुवारी, २०२०

# वैद्यकीय प्रवेश मिळवून देण्याच्या बहाण्याने २९ लाखांचा गंडा

## छत्तीसगडमधील आरोपीला पुणे पोलिसांनी केले जेरबंद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

मुंबईमधील एका वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्याच्या बहाण्याने तब्बल २९ लाखांचा आर्थिक गंडा घालून पसार झालेल्या संतोषकुमार सहानी याला पुणे पोलिस व छत्तीसगड पोलिसांनी संयुक्त कारवाई करत जेरबंद केले. पुढील कारवाईसाठी त्याला छत्तीसगढ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. प्रकरणी जोगेश्वरी देवागन यांनी तेथील स्थानिक पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.



संतोषकुमार हा मूळ झारखंडमधील रायपूरचा असून त्याने 'फ्युचर केअर कन्सलटन्सी' नावाची फर्म काढली होती. त्याद्वारे त्याने फिर्यादीच्या मुलीला मुंबईतील टेरेना मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएसला प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखविले. या प्रलोभनाला फिर्यादी महिलादेखील बळी पडली. प्रवेशाच्या नावाखाली संतोषकुमारने त्यांच्याकडून बँक खात्यावर वारंवार एकूण २९ लाख १५ हजार रुपये घेतले होते. मात्र, मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळवून न देता संतोषकुमारने फसवणूक करून पळ काढला होता. जेव्हा फसवणूक झाल्याचे फिर्यादी महिलेच्या लक्षात आले, तेव्हा त्यांनी छत्तीसगड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.

तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास करत असताना संतोषकुमार हा पुण्यातील विमानतळ परिसरातील टिंगरेनगरात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार छत्तीसगढ पोलिस पुण्यात दाखल झाले. त्यानंतर त्यांनी विश्रांतवाडी पोलिसांच्या मदतीने टिंगरेनगरमध्ये सापळा रचून संतोषकुमारला ताब्यात घेतले.

ही कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरुण आव्हाड, पोलिस निरीक्षक गुन्हे रवींद्र कदम, महिला उपनिरीक्षक स्वाती ठाकूर, कर्मचारी दिनकर लोखंडे, प्रवीण भालचिम, विनायक रामाणे, वामन सावंत, झारखंड पोलिस पथकातील रजनीकांत दिवाण, संतोष शर्मा, रवी साव यांच्या पथकाने केली.

Pune Times Mirror - 19 February, 2020

# TikTok user steals expensive camera from wedding venue

**Accused, a tea stall owner, allegedly has a passion for photography; he gatecrashed the event on Feb 14**

Pune Mirror Bureau
punemirror.feedback@gmail.com
TWEETS @ThePuneMirror

The addiction of making TikTok videos and self-proclaimed passion for photography have allegedly driven a tea stall owner to steal a high-end camera and lenses from a wedding venue in Magarpatta.

The incident took place on February 14 after the accused gatecrashed the wedding venue and fled with the backpack that belonged to the wedding photographer, which had his gears and equipment.

The culprit has been nabbed by Hadapsar police.

According to police, on February 14, the accused made away with photography gadgets worth Rs 1 lakh from Laxmi Lawns in Hadapsar. A case has been registered against the miscreant in Hadapsar police station.

Identified as Prateek Gavhane, the 19-year-old was apparently hooked to making TikTok videos and also liked to try his hand in photography. The teenager, however, could not afford a professional gear to pursue his hobby, which seemingly prompted him to take the wrongful step.

Mahesh Pawar, the photographer at the wedding, lodged a complaint with Hadapsar police after he discovered that his bag and equipment had gone missing from the venue, following which cops scanned the closed-circuit television (CCTV) camera footage from the spot. They spotted some suspicious activity and saw a man make away with Pawar's backpack.



Hadapsar police arrested Gavhane

Prasad Lonare, assistant police inspector attached with Hadapsar police station, told *Mirror*, "The accused was captured in the CCTV footage seized from the spot. He stole the camera bag and fled. We circulated his clip among our informers and got a tip-off about his whereabouts. Gavhane has been arrested and a case has been registered against him under section 379 (theft) of the Indian Penal Code (IPC)."

During police interrogation, Gavhane apparently confessed to have committed the crime. "I watch TikTok videos that others make and like making such clips myself. However, I was unable to buy a high-end mobile phone to make good quality videos and, therefore, took this extreme step," he said in his statement.

Gavhane allegedly gatecrashed the wedding in an unsuspecting way, wearing trousers and suit and even had the wedding spread, cops said. After loitering on the premises for a while, he observed the photographer, added officials. Taking advantage of the crowd, he picked up the bag with the camera and lenses and fled from the spot, police officials informed.

पुढारी – दि. ११ फेब्रुवारी, २०२०

# सव्वापाच लाखांची वायरचोरी करणारा पोलिसांच्या जाळ्यात

**पुणे: पुढारी वृत्तसेवा**

शहरातील कसबा पेठ येथून सव्वापाच लाखांची इलेक्ट्रीक केबल वायर चोरी करणाऱ्याला फरासखाना पोलिसांनी जेरबंद केले. यावेळी त्याच्या ताब्यातून एक लाखाची वायर, चारचाकी गाडी असा तीन लाखाचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. दिनेशसिंह रुपसिंह राजपुरोहीत (वय.४१) असे अटक केलेल्याचे नाव आहे.

दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत असताना सीसीटीव्ही कॅमेरे पाहतेवेळी पोलिसांना आरोपीच्या गाडीचा नंबर मिळाला होता. त्यानंतर पोलिसांनी आरोपीची माहिती काढून त्याला अटक केली. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने व त्याच्या अन्य एका साथीदाराने चोरी केल्याचे कबूल केले. ही कारवाई पोलिस उपायुक्त स्वप्ना गोरे वरिष्ठ निरीक्षक जगन्नाथ कळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.



## तीन लाखांचे वीस मोबाईल नागरिकांना केले परत

फरासखाना पोलिसांच्या हद्दीतून गणेशोत्सवापासून ते आजपर्यंतच्या कालावधीत चोरी झालेले तीन लाखांचे वीस मोबाईल पोलिस शिपाई मोहन दळवी यांनी संबंधित स्थानिक पोलिस ठाण्यांच्या मदतीने पाठपुरावा करत ते ताब्यात मिळवून नागरिकांना परत केले आहेत.

# ‘कॉसमॉस’चे पावणेसहा कोटी परत

## हॉंगकॉंगमधून झाला होता सायबर हल्ला : दीड वर्षानंतर रक्कम मिळविण्यात यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कॉसमॉस बँकेवर झालेल्या सायबर हल्ल्यातील हॉंगकॉंग येथील हॅंगसेन बॅंकेद्वारे गोठविलेल्या रकमेपैकी ५ कोटी ७२ लाख ९५ हजार ८७ रुपये पहिल्या टप्प्यामध्ये कॉसमॉस बँकेस परत केले आहेत. तब्बल दीड वर्षाच्या पाठपुराव्यानंतर ही रक्कम मिळविण्यात यश आले आहे.

कॉसमॉस बँकेच्या गणेशखिंड रोडवरील मुख्य कार्यालयाच्या ए. टी. एम. स्वीचवर (सर्व्हर) सायबर चोरट्यांनी ११ ऑगस्ट २०१८ रोजी दरोडा घालून बॅंकेच्या व्हिसा व रुपे डेबिट कार्डधारकांची माहिती चोरली. त्याद्वारे व्हिसा डेबिट कार्डद्वारे ७८ लाखांचे व्यवहार भाराताबाहेर झाले असून, रुपे डेबिट कार्डद्वारे २ कोटी ५० लाख रुपयांचे व्यवहार भारतात झाले आहे. एकूण १४ हजार ८४९ व्यवहारांद्वारे ८० कोटी ५० लाख रुपयांची फसवणूक केली होती. त्यानंतर १३ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी साडेअकरा वाजता स्वीफ्ट ट्रान्झॅक्शन इनिशिएट करुन हॉंगकॉंग येथील हॅंगसेंग बॅंक या बॅंकेच्या ए. एल. एम. ट्रेडिंगच्या बॅंक खात्यावर १३ कोटी ९२ लाख रुपये जमा करुन ते काढून घेतले. अशा प्रकारे कॉसमॉस बॅंकेची ९४ कोटी ४२ लाख रुपयांची फसवणूक झाली होती.

या गुन्ह्याचा तपास सायबर पोलिसांकडे दिला होता. सायबर पोलिसांनी तत्काळ हॅंगसेंग बॅंक व हॉंगकॉंग पोलिसांशी संपर्क करुन कॉसमॉस बॅंकेतर्फ तक्रार नोंदविली होती. त्याचा तपास डिटेक्टिव्ह हॉंगकॉंग पोलिसांचे लुंग यांच्याकडे दिला होता. तसेच हॅंगसेंग बॅंकेच्या म्हणण्यानुसार हॉंगकॉंग पोलीस व हॅनसेंग बॅंकेमध्ये समन्वय साधून दिला होता. त्यानंतर दिल्ली येथे जाऊन १६ नोव्हेंबर २०१८ रोजी भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयामार्फत हॉंगकॉंग पोलीस, हॉंगकॉंग दूतावास यांच्याकडे सायबर पोलिसांचा पाठपुरावा सुरु होता. या काळात हॉंगकॉंग पोलिसांचे तपास अधिकारी बदलले. नवीन तपासी अधिकारी पॅंग यान लोक यांच्याशी सायबर पोलिसांनी संपर्क करुन त्यांना गुन्ह्याबाबत पूर्ण माहिती दिली. त्यानंतर पॅंग यान लोक यांनी कळविले की, पुणे सायबर पोलिसांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे काही रक्कम गोठविलेली आहे. सायबर पोलिसांनी कॉसमॉस बॅंकेला तत्काळ हॉंगकॉंगमध्ये सिव्हिल सूट दाखलच्या सूचना दिल्या. हॉंगकॉंग न्यायालयाने हॅनसेंग बॅंकेद्वारे गाठविलेल्या रक्कमेपैकी ८ लाख २ हजार २८३. ६५ अमेरिकन डॉलर म्हणजेच ५ कोटी ७२ लाख ९५ हजार ८७ रुपये एवढी रक्कम पहिल्या टप्प्यामध्ये कॉसमॉस बॅंकेस परत केली आहे. पोलीस उपायुक्त संभाजी कदम, तत्कालीन पोलीस उपायुक्त ज्योती प्रियासिंग यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, सहायक निरीक्षक सागर पानमंद, पोलीस नाईक अजित कुऱ्हे, संतोष जाधव या पथकाने कामगिरी केली.

### कॉसमॉस बॅंक सायबर दरोड्यात आतापर्यंत १८ जण अटकेत

- परदेशातून व्हिसा डेबिट कार्डद्वारे ८0 कोटी ५0 लाख रुपये काढण्यात आले असताना त्यावेळी भारतभरातील विविध शहरांमधून रुपे डेबिट कार्डद्वारे अडीच कोटी रुपये काढण्यात आले होते. त्याचा तपास करत असताना सर्वाधिक रक्कम कोल्हापूर येथून काढण्यात आल्याचे निष्पन्न झाले.
- सायबर पोलिसांनी कोल्हापूर येथील एटीएममधून काढताना मिळालेल्या माहितीवरुन सुरुवातीला काही जणांना अटक केली. त्यानंतर मुंबई, जयपूर, इंदूर अशा विविध शहरांतून एटीएममधून पैसे काढणाऱ्या १८ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यांना दुबईत बसून एकाने ही सर्व बनावट रुपे डेबिट कार्ड व त्यांचा पासवर्ड पुरविला असल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे.
- परदेशात ज्यांनी ही बनावट डेबिट कार्ड तयार करुन २८ देशांतील एटीएममधून रक्कम काढली, त्यांचे धागेदोरेही सायबर पोलिसांना लागले आहेत. परराष्ट्र मंत्रालयामार्फत त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी आवश्यक ती माहिती त्या त्या देशांना देण्यात आली आहे.

# बनावट चलनी नोटा प्रकरण; केरळमधून एकाला अटक

## खंडणीविरोधी पथकाची कामगिरी

**पुणे: पुढारी वृत्तसेवा**

बनावट चलनी नोटाप्रकरणी खंडणीविरोधी पथकाने एकाला केरळ येथून ताब्यात घेतले. निधीश उर्फ पंडित विनायक कळमकर ऊर्फ अक्षय विलास शर्मा (३६,रा. उंड्री कोंढवा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. आरोपीला न्यायालयाने सात दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. यापूर्वी पोलिसांनी त्याच्या इतर दोन साथीदारांना अटक केली आहे. आरोपी हा बनावट नोटा छापून त्या मार्केटमध्ये वितरित करण्यात सराईत असून, यापूर्वी देखील त्याच्यावर हैदराबाद, पुणे ग्रामीण परिसरात गुन्हे



दाखल आहेत.

२०१९ मध्ये आरोपी निधीश कळमकर याच्यासह त्याच्या इतर दोन साथीदारांवर बनावट नोटाप्रकरणी समर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. तेव्हापासून आरोपी हा फरार होता. मात्र, अशाच प्रकारचा गुन्हा केल्याने त्याला केरळ पोलिसांनी अटक करून तेथील पेरूपांडू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करीत असताना गुन्हे शाखेचे वरिष्ठ निरिक्षक राजेंद्र मोहिते यांना कळमकर याला अटक केल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने केरळ येथे जाऊन त्याला ताब्यात घेतले. आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या व त्यांनी बाजारात वितरित केलेल्या बनावट नोटा कोठे छापल्या आहेत, यामध्ये त्याचे आणखी कोणी साथीदार आहेत का, कोणत्या साहित्यावर छपाई केली आहे. या सर्व बाबींचा तपास पोलिस करीत आहेत. ही कामगिरी वरिष्ठ निरिक्षक राजेंद्र मोहिते, उपनिरीक्षक संजय गायकवाड, कर्मचारी प्रमोद मगर, मनोज शिंदे, सचिन कोकरे, फिरोज बागवान, मंगेश पवार यांच्या पथकाने केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २० फेब्रुवारी, २०२०

# व्यावसायिकाला खंडणी मागणाऱ्याला अटक

म. टा. प्रतिनिधी, हडपसर

हडपसर औद्योगिक वसाहतीतील व्यावसायिकाला हप्ता मागणाऱ्या खंडणीखोराला हडपसर पोलिसांनी अटक केली. या प्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात मंगळवारी खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

श्रीकृष्ण सिद्धेश्वर राठी (वय ४८, रा. पुणे) यांनी हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. सिद्धेश्वर दिलीप चव्हाण (वय २२ रा. रामटेकडी, हडपसर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसर औद्योगिक वसाहतीमध्ये फिर्यादी राठी श्रीकृष्ण अॅग्रो कंपनी नावाने व्यवसाय करतात. मंगळवारी सकाळी आरोपी सिद्धेश्वर चव्हाण कंपनीच्या आवारात आला. 'तुमची कंपनी माझ्या हद्दीमध्ये आहे. मला महिना दोन हजार रुपये हप्ता द्यावा लागेल; अन्यथा कंपनी चालू देणार नाही,' असा दम राठी यांना दिला. यानंतर राठी यांनी हडपसर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी तत्काळ चव्हाण याला अटक केली. ही कामगिरी हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश साठे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली. आरोपी चव्हाण याच्यावर यापूर्वीही एक खंडणीचा गुन्हा दाखल आहे.

दिगंबर माने



अटक केलेला खंडणीखोर आणि पोलिसांचे पथक.

TIMES OF INDIA - 6 February, 2020

# 2 in net on charge of sharing child pornography video clip

**Pune:** The cybercrime police on Tuesday arrested two men on the charge of uploading a video depicting child pornography on a website in April last year.

After tracking the Internet Protocol (IP) address of the cellphone, which was used to upload the video clip, police arrested Raj Kiran Pattilal (24) of Guruwar Peth and Manojkumar Zallar Saroj (19) of Raviwar Peth.

The police found the link to the clip on Monday and started looking into it. They took suo motu cognisance of the clip and filed the case, first such in Pune after a Union government order. The case has been registered with the Khadak police station.

Around a month ago, the Union government traced 35,000 videos depicting child pornography on various websites. The government followed up on this finding by ordering every state government to take action against people involved in uploading or sharing child pornography, the cybercrime police said.

Prima facie probe revealed that almost 150 links or video clips related to child pornography were uploaded from Pune in the past one to one-and-a-half years.

Senior police inspector Jayram Paygude of the cybercrime police station told **TOI**, "School dropouts Pattilal and

## IP ADDRESS TRACKED

Saroj were employed at a utensil shop in Raviwar Peth. The duo had uploaded the video clip on a website from the shop in their free time. The two men did not create the video, they obtained it from someone else."

In a similar case, the Wakad police on Tuesday booked a man for uploading pornographic videos of women and children on a social media site.

The identity of the man has not been established yet. However, the police have launched a manhunt.

The Wakad police said the man uploaded 20-25 pornographic videos on the site through his profile in a span of six months. The videos went viral within days, the police said.

The police have invoked provisions of the Information Technology (IT) Act and the Protection of Children from Sexual Offences (POCSO) Act against the man.

The police have warned people against uploading videos related to child pornography on the Internet and sending it through Internet-based mobile messaging applications.

Anyone found in possession of digital or even computer-generated sexually explicit images that appear to depict a child will have to face punishment, as per the provisions proposed in the Protection of Children Against Sexual Offences Amendment Bill that was approved by the Union Cabinet on July 10, 2019.

**सामना** – दि. २४ फेब्रुवारी, २०२०

# तीन वर्षांपासून फरार आरोपीला पश्चिम बंगालमधून अटक

पुणे, दि. २३ (प्रतिनिधी) – सोने व्यापाऱ्याची फसवणूक करून ५६ लाखांचे दागिने घेऊन फरार झालेल्या एकाला फरासखाना पोलिसांनी पश्चिम बंगालमधून जेरबंद केले.

सुभाष घोष (रा. पश्चिम बंगाल) असे जेरबंद केलेल्याचे नाव आहे. सोने व्यापाऱ्याला फसवून ५६ लाखांचे दागिने पळवून नेण्याची घटना २०१७ मध्ये घडली होती. त्यापैकी एकाला पोलिसांनी जेरबंद केले होते. त्याचा साथीदार सुभाष तीन वर्षांपासून फरार झाला होता. चौकशीदरम्यान सुभाष पश्चिम बंगालमध्ये घरी असल्याची माहिती फरासखाना पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याला जेरबंद केले. ही कामगिरी सहायक पोलीस निरीक्षक प्रदीप आफळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दादा गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक यशपाल सूर्यवंशी, प्रमोद हंबीर, बापू खुटवड, सयाजी चव्हाण, केदार आढाव, मोहन दळवी, दीनेश भांदुर्गे, महावीर वलटे, मयूर भोकरे, शंकर कुंभार, विकास बोऱ्हाडे, अमोल सरडे, हनीफ शेख, विशाल चौगुले, आकाश वाल्मीकी, अमेय रसाळ, पंकज देशमुख यांच्या पथकाने केली.

**पुढारी** – दि. ५ फेब्रुवारी, २०२०

# गाडी पार्क करण्याच्या वादातून मारहाण करणाऱ्या चौघांना अटक

**पुणे : प्रतिनिधी**

गाडी पार्क करण्याच्या वादातून शिविगाळी करून लाकडी दांडक्याने, लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी दत्तवाडी पोलिसांनी चौघांना अटक केली.

पृथ्वीराज मिलिंद बेंद्रे (१९), मिलींद किसनराव बेंद्रे (५४, दोघेही रा. शिवदर्शन, तावरे कॉलनी), सिध्दार्थ संजय पलंगे (२०, रा. पंचशील अपार्टमेंट, धनकवडी), महेश श्यामसुंदर जमदाडे (१९, रा. बालाजीनगर, धनकवडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

याबाबत सुनील पिसे (३०, पर्वती) यांनी दत्तवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. २ फेब्रुवारी रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारस प्रिन्स हेअर कटिंगच्या दुकानासमोर रस्त्यावर सुनील हे मित्रासोबत गप्पा मारत थांबले होते, त्या वेळी गाडीपार्क करण्याच्या वादातून फिर्यादीच्या डोक्यात कोयत्याने वार करून जखमी केले. तसेच, धनंजय डिंबळे यांना मिलिंद बेंद्रे व त्याचा भाचा सिद्धार्थ याने पाठीत कोयत्याने वार करून जखमी केले. तसेच, सिद्धार्थ याच्या मित्रांनी त्यांच्याकडील लाकडी दांडक्याने लाथा-बुक्क्यांनी फिर्यादी व त्यांच्या मित्रांना मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. तपास एस. एस. सलगर करीत आहेत.



पुढारी – दि. १० फेब्रुवारी, २०२०

# मॉडेलच निघाली अंगठीचोर! तरुणी गजाआड

## खरेदीचा बहाणा करून मारला डल्ला

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

ज्वेलर्सच्या दुकानात येऊन दागिने पाहण्याच्या बहाण्याने उच्चभ्रू राहणीमान असलेल्या एका मॉडेल तरुणीने काही दिवसांपूर्वी अंगठ्या चोरून नेल्या होत्या. तिला गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने अटक केली.

स्नेहलता ऊर्फ स्नेहल ऊर्फ साक्षी पाटील (२५, रा. कोथरूड) असे तिचे नाव आहे. तिला एनआयबीएम रोडवरील क्लोव्हर प्लाझा मॉलमधून पोलिसांनी ताब्यात घेतले. लष्कर भागातील सेंट्रल स्ट्रीटवरील खरी पेढी ज्वेलर्समध्ये ही तरुणी २० जानेवारी रोजी आली होती. खरेदीचा बहाणा करुन तिने दोन अंगठ्या चोरुन नेल्या होत्या.

लष्कर पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरु होता. पोलिस नाईक मोहसीन शेख यांना हा गुन्हा स्नेहलता पाटील हिने केल्याची माहिती मिळाली. बातमीची सत्यता पडताळून पाहत असताना स्नेहलता ही एनआयबीएम रोडवरील क्लोव्हर प्लाझा मॉलमध्ये आली असल्याची माहिती मिळाली. तिला तेथून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत तिने गुन्ह्याची कबुली दिल्यावर तिला अटक करण्यात आली.



संग्रहित छायाचित्र

अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंग, सहायक आयुक्त डॉ. शिवाजी पवार, पोलिस निरीक्षक महेंद्र जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक नितीन शिंदे, सहायक फौजदार यशवंत आंब्रे, महिला हवालदार मोहिते, ढेबे, मोहसीन शेख, गोपाळ मदने यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

## सुनेनेच चोरले बहिणीच्या मदतीने सोन्याचे दागिने...

### अवघ्या सात तासांत पोलिसांनी आणला प्रकार उघडकीस

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सोन्याचे दागिणे घालू देत नसल्यामुळे बहिणीच्या मदतीने सुनेनेच पाच लाखांचे दागिने चोरले. मात्र, पोलिसांनी सखोल तपास करून अवघ्या सात तासांत सुनेकडून चोरीचे दागिने हस्तगत करून सासऱ्याकडे दिले आहेत.

दुपारी सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास वानवडी पोलिसांना नियंत्रण कक्षातून रामटेकडी परिसरात चोरी झाल्याची माहिती मिळाली. त्यानंतर सहायक निरीक्षक जगताप आणि विनोद भोसले यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली .यावेळी चोरी झालेल्या घरात चोरीच्या काळात तक्रारदाराची सून आणि तिच्या बहिणीव्यतिरीक्त अन्य कोणीही आले नसल्याचे निदर्शनास आले. संशय बळावल्याने या दोघींना पोलिस ठाण्यात नेऊन दामिनी पथकातील महिला पोलिसांनी दोघींची वेगवेगळ्या बसवून चौकशी केली असता, सोन्याचे दागिने घालावयास देत नसल्याने ही चोरी केल्याची कबुली दोघींनी दिली आहे.

दोघींनी चोरलेले दागिणे न्हाणी घरात ठेवले होते. ते पाच लाख रूपये किंमतीचे १४ तोळे सोन्याचे दागिणे पोलिसांनी हस्तगत करून तक्रारदाराच्या स्वाधीन करण्यात आले आहेत. ही कामगिरी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक जगताप आणि विनोद भोसले, महिला पोलिस हवालदार पवार यांनी केली.

**पुढारी** – दि. ५ फेब्रुवारी, २०२०

# तुकाईनगर गोळीबारप्रकरणी तिघांना अटक

## सिंहगड रस्ता परिसरातील घटना; गॅरेज चालकावर झाडल्या होत्या गोळ्या

**पुणे/ धायरी : पुढारी वृत्तसेवा**

पूर्ववैमनस्यातून व संशयित आरोपीची आई गांजाची विक्री करत असल्याची खबर पोलिसांना दिल्याच्या संशयातून भरदुपारी पांडुरंग मोरे (४२, रा. नऱ्हे, पुणे) या गॅरेज चालकावर गोळ्या झाडून व कोयत्यासारख्या शस्त्राने वाहनांची तोडफोड करत दहशत माजविणाऱ्या टोळक्यातील तीन जणांना सिंहगड रस्ता पोलिसांनी अटक केली आहे.

अर्जुन उर्फ आर. जे. विठ्ठल कांबळे (१९, रा. तुकाईनगर, समाजमंदिराजवळ, वडगाव बुद्रुक), राजू उर्फ बब्या दीपक मोरे (१९, रा. समर्थनगर, हिंगणे), विशाल उर्फ विशल्या अनिल भांडे (१९, रा. नीलकमल सोसायटी, कुमार वस्ती, इंदिरानगर, बिबवेवाडी) अशी त्यांची नावे आहेत.

सिंहगड रोड परिसरात तुकाईनगर येथे पांडुरंग मोरे याचे आय क्रिएट कार हब गॅरेज आहे. दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास मोरे यांच्या गॅरेजवर दुचाकीवरून आलेल्या दहा-बारा जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर गोळीबार करून त्यांनी जिवे मारण्याचा प्रयत्न केला. मात्र गॅरेजचा दरवाजा बंद करून घेतल्यामुळे गोळ्या भिंतीवर आणि दरवाजावर धडकल्या. त्यानंतर हल्ला करणाऱ्यांनी आजूबाजूस उभ्या असलेल्या गाड्या फोडल्या आणि तेथून निघून गेले. गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक सतीश उमरे करीत आहेत.

### तीन तासांतच आरोपी जेरबंद

मोरे यांच्यावर गोळीबार केल्यानंतर तुकाईनगर परिसरात असलेल्या डोंगरभागात संशयित आरोपी लपलेले होते. पोलिसांनी त्यांचा माग काढत त्यांना तीन तासांत जेरबंद केले. गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्याकडे तपास सुरू असल्याचे गुन्ह्याचे तपास अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक सतीश उमरे यांनी सांगितले.

**सामना** – दि. १३ फेब्रुवारी, २०२०

# इराणी केशर खरेदी करून १२ लाखांची फसवणूक

## गुजरात येथील एकाला अटक

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी) – पाच किलो इराणी केशरची ऑर्डर देऊन त्याबदल्यात बनावट धनादेश देऊन ११ लाख ५५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी एकाला सायबर पोलिसांनी गुजरात येथून अटक केली. त्याला १६ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.

राहुल मनसुखलाल बाघेला (रा. सारांश अर्थ, साऊथ वासाना, अहमदाबाद, गुजरात) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत अशोक भाऊपाटील आंधळे (वय ५४, रा. प्रीझम सोसायटी, औंध, पुणे) यांनी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. हा प्रकार एप्रिल ते नोव्हेंबर २०१९ दरम्यान घडला.

राहुलने लक्ष्मी इंटरप्रायझेसचे मालक अशोक यांच्या मोबाईलवर सचिन आगरवाल असे खोटे नाव सांगून फोनद्वारे व ई-मेलद्वारे संपर्क साधला. त्यामध्ये पाच किलो इराणी केशरची ऑर्डर देऊन त्याबदल्यात अहमदाबाद येथील आयडीएफसी बँकेचा ११ लाख ५५ हजारांचा बनावट पोस्ट डेटेड धनादेश पाठविला. केशर पाठवल्यानंतर धनादेश न वटल्याने तक्रारदारांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. अशोक यांनी केशर कुरिअरद्वारे पाठविले होते. त्या कुरिअरच्या कंपनीचे काही संगनमत आहे का? संशयित आरोपीने अशाच प्रकारे यापूर्वी इतर व्यापाऱ्यांनाही गंडविल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याचा तपास करण्यासाठी सरकारी वकील ज्ञानेश्वर मोरे यांनी पोलीस कोठडीची मागणी केली.

लोकमत - दि. २१ फेब्रुवारी, २०२०

## तिघांना अटक : वानवडी पोलिसांची कामगिरी

# चोरट्यांकडून १ कोटीचा ऐवज हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : घरफोड्या करणाऱ्या दोघा सराईतांसह चोरीचा माल विकत घेणाऱ्या पंटरला वानवडी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून १०९ किलो चांदीचे दागिने, २० तोळे सोन्याचे दागिने, ५ चारचाकी वाहने, २ दुचाकी वाहने, २७ हजार रुपयांची रोकड, ५ बनावट चाव्या, घरफोडीचे साहित्य असा तब्बल १ कोटी ९ हजार ५३० रुपयांचा माल जप्त केला आहे.

तिलकसिंग गब्बरसिंग टाक (वय २८, रा. रामटेकडी, हडपसर), जयसिंग ऊर्फ पिल्लूसिंग कालुसिंग जुनी (वय २६, रा. वैदवाडी, हडपसर) व बंडू वसंत वाघमारे (वय ३५, रा. गोसावीवस्ती हडपसर) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. अटक केलेले दोघेही आरोपी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्यांच्यावर शहर, पुणे ग्रामीण व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.



घरफोडी प्रकरणातील चोरट्यांना पकडणारे पोलीस पथक

### चोरट्यांकडून २१ गुन्हे उघडकीस



- या चोरट्यांकडून एकूण २१ गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे. त्यात कोंढवा ५, वानवडी ३, हडपसर, येरवडा, वाकड प्रत्येकी २ आणि मुंढवा, सिंहगड, लोणी काळभोर, चिखली, हिंजवडी, सासवड या पोलीस ठाण्यातील प्रत्येकी एक गुन्हा उघडकीस आला आहे. त्यात १७ गुन्हे हे या नव्या वर्षातील आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३ फेब्रुवारी रोजी घरफोडी झाली होती. या गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत असताना पोलिसांनी वानवडी परिसरातील ३४ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. त्यातील फुटेजचे विश्लेषण केले असताना वाकड, चिंचवड, सिंहगड रोड परिसरात झालेल्या ज्वेलर्सच्या दुकानातील चोऱ्यांशी मिळते जुळते असल्याचे दिसून आले. आरोपींच्या चालण्या, वागण्याच्या हावभावावरून ते रामटेकडी, हडपसर परिसरातील असल्याचा संशय होता. पोलीस शिपाई नासीर देशमुख व नवनाथ खताळे यांना बातमीदारांकडून माहिती मिळाली. त्यावरुन तिलकसिंग टाक व जयसिंग जुनी यांना ताब्यात घेण्यात आले. दोघांकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी गुन्हे केल्याची कबुली दिली.

दरम्यान आरोपींनी शहर ग्रामीण व पिंपरी-चिंचवड परिसरात केलेल्या चोऱ्या विकीसिंग जालिंदरसिंग कल्याणी व सनीसिंग पापासिंग दुधाणी यांच्यासोबत केल्याचे समोर आले. हे दोघेही साथीदार अद्याप फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. या तपास पथकाला सह पोलीस आयुक्तांना ५० हजारांचे पारितोषिक जाहीर केले आहे.

ही कामगिरी सह पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त सुनील फुलारी, उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलीस आयुक्त सुनील कलगुटकर, वरिष्ठ निरीक्षक क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे निरीक्षक सलीम चाऊस,उपनिरीक्षक जोगदंड, कर्मचारी रमेश भोसले, राजू रासगे, योगेश गायकवाड, संभाजी देविकर, नासीर देशमुख, नवनाथ खताळ, अनुप सांगळे, युवराज दुधाळ, सुदर्शन बोरावके यांच्या पथकाने केली.

Pune Times Mirror - 11 February, 2020

# Duo nabbed for thefts of sports bikes over 6 mnths

## Techie who owns shop stole bikes with help of criminal on record

Six months after they first began stealing high-end sports bikes around the city, a software engineer who owns a mobile repair shop in Saswad and his criminal friend were nabbed by police this weekend.

As per information with Faraskhana cops, the arrested duo was identified as Purandar resident Sagar Sharad Samgir (28) and Hadapsar resident Santosh Vishnu Nagare (25).

Techie Samgir had allegedly stolen the vehicles with Nagare's help because he wanted to develop his business and also impress his girlfriend, taking her on long rides on a different, fancy bike each time.

Nagare is criminal on record, who used to visit the shop for mobile repairs, where both of them became friends and planned the thefts.

Constable Shankar Kumbhar of Faraskhana police station received a tip-off about the accused coming to Ganesh Peth on Saturday to buy a blunt mace (locally known as a 'gadda'), with the additional information that these two are behind multiple bike thefts that have kept the cops on their toes. As per the cops, the duo was buying the 'gadda' as a gift for the winner of a grand kushti (wrestling) competition organised and held annually in Saswad. But, the duo was trapped and arrested instead. Cops recovered 20 sports bikes worth a total of Rs 14 lakh.



Accused duo Samgir (L) and Nagare (R)

When interrogated, Samgir and Nagare refused to reveal what their motive was properly. But, a check of Samgir's mobile phone revealed on his WhatsApp chat records that he had promised his girlfriend a lavish life and given her costly gifts. Interestingly, all the bikes were being kept in an open space at Samgir's house, hidden under stacks of hay.

Senior police inspector Jagannath Kalaskar of Faraskhana PS shared, "A case was registered against the accused under section 379 (theft) of the Indian Penal Code (IPC). We are investigating the matter."

— PMB

महाराष्ट्र टाइम्स – दि. १३ फेब्रुवारी, २०२०

# तरुणाचा मोबाइल चोरणाऱ्यास अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे




जेवण करण्यासाठी हॉटेल शोधत असताना नरपतगिरी चौकात तरुणाचा मोबाइल हिसकाविल्याची घटना घडली होती. या प्रकरणी समर्थ पोलिसांनी सीसीटीव्हीवरून मोबाइल चोरणाऱ्यास अटक केली आहे.

शोएब शेख (रा. गुलटेकडी) असे अटक केलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी लालू सिंग (वय १८, रा. मंगळवार पेठ) याने समर्थ पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लालू सिंग आणि त्याचा एक मित्र सोमवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास नरपतगिरी चौकात जेवण्यासाठी आले होते. हॉटेल शोधताना दुचाकीस्वार आलेल्या तरुणाने त्यांना अडविले. त्यांना धमकावून त्यांच्या खिशातील मोबाइल चोरून नेला. चोरी झालेल्या काही अंतरावरच नरपतगिरी पोलिस चौकी आहे. मात्र, पोलिसांना घटनेचा काहीच मागमूस नव्हता. त्यांनी तक्रार दिल्यानंतर समर्थ पोलिस ठाण्याच्या तपास पथकाने चौकातील सीसीटीव्ही फुटेज पाहिले. त्या वेळी मोबाइल चोरणारा शोएब शेख असल्याचे एका कर्मचाऱ्याने ओळखले; तसेच हा आरोपी गुलटेकडी परिसरात असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार उपनिरीक्षक प्रभाकर कापुरे, साहिल शेख, गणेश कोळी, नीलेश सावळे यांच्या पथकाने सापळा रचून त्याला पकडले. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर त्याने मोबाइल चोरल्याची कबुली दिली. शोएब शेख सराईत असून, कोंढवा, मार्केट यार्ड, स्वारगेट, वानवडी पोलिस ठाण्यात त्याच्यावर आठ गुन्हे दाखल आहेत.

# चार बाइक चोर गिरफ्तार : चोरी के 25 टू-व्हीलर्स बरामद

## डीसीपी सुहास बावचे द्वारा पत्रकार-वार्ता में जानकारी : चोरों में एक प्रोफेशनल डान्सर भी शामिल

**पुणे, 25 फरवरी (आ.प्र.)**

नाबालिग लड़कों एवं कॉलेज स्टूडेंट्स को टू-व्हीलर्स चुराते हुए देखा गया है, मगर एक प्राफेशनल डान्सर को टू-व्हीलर चुराते हुए पहली बार ही देखा गया. उक्त बाइक चोर प्रोफेशनल डॉन्सर एवं उसके साथियों को हड़पसर पुलिस ने गिरफ्तार कर उनके पास से चोरी के 25 टू-व्हीलर्स जब्त किए हैं. पुलिस ने इन बाइक चोरों के पास अभी और टू-व्हीलर्स बरामद होने की संभावना जताई है. यह जानकारी डीसीपी सुहास बावचे ने पत्रकार-वार्ता में दी.

गिरफ्तार आरोपियों में संजय हरीश भोसले उर्फ सोन्या (उम्र 20 वर्ष), ऋषिकेश बाबासाहेब डोंगरे उर्फ बिट्टू (उम्र 19 वर्ष), अभिषेक अनिल भंडगे उर्फ मोनू (उम्र 19 वर्ष) एवं अजीत कैलाश उर्फ विठ्ठल (उम्र 21 वर्ष, सभी निवासी शेवालवाड़ी) का समावेश है. शहर में सेंधमारी तथा बाइक चोरी की घटनाएं बढ़ गई हैं. पुलिस भी चोरों का सुराग लगाने में असफल साबित हो रही है. इस वजह से क्राइम ब्रांच एवं स्थानीय पुलिस को कार्यक्षेत्र में पेट्रोलिंग का आदेश दिया गया है. पेट्रोलिंग के दौरान हड़पसर पुलिस को मगरपट्टा चौक स्थित पार्किंग में चार लोगों के संदिग्ध रूप से उपस्थित होने की जानकारी मिली. जानकारी मिलते ही पुलिस ने कार्रवाई करते हुए चारों आरोपियों को हिरासत में लेकर पूछताछ की. पहले तो आरोपियों ने टालमटोल वाले जवाब दिए, मगर कड़ाई से पूछे जाने पर उन्होंने टू-व्हीलर्स चोरी का अपराध स्वीकार कर लिया. चोरों से प्राप्त जानकारी पर पुलिस ने हड़पसर में 11 तथा वानवड़ी, कोंढवा, सिंहगढ़, सहकारनगर, मार्केटयार्ड, येरवड़ा, शिवाजीनगर, लोणीकंद, लोणी कालभोर, यवत एवं लातूर पुलिस स्टेशनों की सीमा से एक-एक सहित 25 बाइक्स जब्त कीं.



**बाइक चोरों के विषय में डीसीपी सुहास बावचे ने पत्रकार-वार्ता में जानकारी दी. यहां अन्य पुलिस अधिकारी भी उपस्थित थे.**

बाइक चोर इन गाड़ियों को ग्रामीण भागों में बेचने वाले थे. इस मामले का सूत्रधार संजय भोसले है. उसने अन्य तीन साथियों को गिरोह में शामिल किया. आरोपियों में शामिल अभिषेक भंडगे प्रोफेशनल डॉन्सर है.

वह एक डॉन्स एकेडमी में परफॉर्म करता है. चारों आरोपी पिछले छह महीनों से सिर्फ मजे के लिए चोरी की वारदातों को अंजाम दे रहे हैं. यह कार्रवाई डीसीपी सुहास बावचे, सीनियर इंस्पेक्टर रमेश साठे, एपीआई संजय चव्हाण, शाहिद शेख, शशिकांत नाले, गोविंद चिवले एवं प्रशांत टोणपे आदि पुलिसकर्मियों की टीम द्वारा की गई.

लोकमत – दि. ६ फेब्रुवारी, २०२०

# गाडीला कट मारल्याच्या रागातून त्याने डॉक्टराचा फोडला डोळा

## तिघांना अटक : तब्बल ३२ सीसीटीव्हीतून आरोपी झाले निष्पन्न

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : गाडीला कट मारल्याच्या रागातून तरुणाचा चाकूने डोळ्यावर वार करुन तो फोडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी हडपसर पोलिसांनी तिघांना अटक केली. आरोपींचा शोध घेण्यासाठी हडपसर पोलिसांनी तब्बल ३२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने आरोपींचा माग काढला. आरोपींच्या कारवरील एका लोगोच्या आधारे गुन्हा घडल्यानंतर ४८ तासांत त्यांना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.

योगेश चंद्रकांत हनमणे (वय २४, रा. सोलापूर), रितेश अंबादास जाधव (वय २१, रा. केशवनगर, मुंढवा), अविनाश सुनील गायकवाड (वय २२, रा. केशवनगर, मुंढवा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. एक आरोपी फरार झाला आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले, की हडपसरजवळील मुंढवा चौकात रविवारी पहाटे दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली होती. अक्षय ज्ञानेश्वर जाधव (वय २४, रा. कासरीवाल, औरंगाबाद) व सतीश सुधाकर वानखेडे मोटारसायकलवरुन जात असताना आरोपींनी त्यांच्या गाडीचा पाठलाग करुन त्यांना हॉटेल कल्ट येथे अडविले. त्यावेळी आरोपींनी सतीश वानखेडे यांना आमच्या गाडीला कट का मारला, अशी विचारणा करीत त्यांच्या खांद्यावर, पाठीवर व डोळ्यावर वार करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आरोपी पळून गेले होते. वानखेडे उच्चशिक्षित असून मेडिकलमधून ऑप्थॉमिस्ट (डोळ्याबाबत) या विषयाचे शिक्षण घेतले आहे.

या किरकोळ वादातून त्यांचा एक डोळाच निकामी झाला आहे. वानखेडे यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत.

### कोणताही पुरावा नसताना शिताफीने केला तपास




- तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या घटनेत कोणताही पुरावा अथवा माहिती नसताना वानखेडे व त्यांच्या मित्रांनी दिलेल्या एका माहितीवरुन तपास सुरु केला.
- त्यांच्या कारवर महाराष्ट्राच्या नकाशाचा लोगो असल्याची माहिती मिळाली होती. त्याआधारे पोलिसांनी घटना घडली त्याच्या आजूबाजूच्या रोडवरील सीसीटीव्हीचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली. तब्बल ३२ फुटेज तपासल्यानंतर त्यांना गुन्ह्यातील कारची माहिती मिळाली.
- त्यावरुन पोलिसांनी तिघा आरोपींना अटक करुन गुन्ह्यात वापरलेली कार जप्त केली आहे. पोलीस उपनिरीक्षक क्षीरसागर अधिक तपास करीत आहेत.

TIMES OF INDIA - 21 February, 2020

# 2 criminals arrested for over 20 burglaries

## Man In Net For Receiving The Booty

Times News Network



Police seized 109.27kg silver, 200g gold, four cars and two motorcycles valued at over Rs1 crore from the arrested persons

**Pune:** Analysing CCTV cameras and studying modus operandi of burglars helped the Wanowrie police arrest two criminals on Wednesday and detect 21 cases, including burglaries at three jewellery stores and vehicle thefts from 2018.

Police seized 109.27kg silver, 200g gold, four cars and two motorcycles valued at over Rs1 crore from the arrested duo—Tilaksingh Tak (28) and Jaisingh alias Pillusingh Juni (26) from Ramtekdi and Vaiduwadi. Bandu Waghmare (35) from Hadapsar was also taken into custody for receiving the stolen loot from the criminals.

The police launched investigations into a burglary case lodged with the Wanowrie police on February 3. They analysed footage from 34 CCTV cameras capturing images of Tak and Juni, involved in stealing ornaments from jewellery stores at Wakad, Chinchwad and Sinhagad Road, among other places.

Acting on a tip-off, a police team comprising Nasir Deshmukh and Navnath Khatal, under senior inspector Krantisinh Patil, arrested Tak and Juni.

Senior inspector Patil said in a statement, "Tak and Juni admitted to their involvement in a string of burglaries registered with the Pune and Pimpri Chinchwad police commissionerate, and the Pune rural police from 2018. They have also spit out the names of their two accomplices on the run during questioning."

The police said the suspects would steal vehicles and use them for committing burglaries at jewellery stores and other places at night. They would abandon the vehicles after exhausting the fuel or if they developed technical snags.

"We have also seized a screw driver, crowbar, three scissors and five duplicate keys from the criminals. A team under inspector Salim Chaus has launched a hunt for arresting the criminals on the run," Patil said in the statement.

Sakal Times - 11 February, 2020

# 2 persons nabbed, 20 bikes recovered

■ ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** The sleuths from Faraskhana police station arrested two persons and claimed to have recovered 20 stolen two-wheelers from their possession.

The arrested persons were identified as Santosh Vishnu Nagre (25) of Buldhana district who lived in Hadapsar and Sagar Sharad Samgir (28) of Veerta village in Purandar taluka of Pune district. They were caught after a tip-off was received by policeman Shankar Kumbhar.

DCP (Zone 1) Swapna Gore said, "Based on the information, a trap was laid in Ganesh Peth Dudhbhatti area and the duo were arrested. Till now we have recovered 20 two-wheelers worth Rs 14 lakh from their possession."



**HAUL:** The policemen with the arrested persons and recovered bikes on Monday at Faraskhana police station.

The investigation team included Senior Police Inspector Gajendra Kalaskar, PI Dadasaheb Gaikwad, PSI Pradeep Hambir, Yashpal Suryawanshi, and policemen Bapu Khutwad, Sayaji Chavan, Kedar Adhav, Vikas Borhade, Amol Sarde, Dinesh Bhandurge, Mahavir Walte, Hanif Shaikh, Vishal Chaugule, Akash Valmiki, Amey Rasal, Mayur Bhokre, Mohan Dalvi and Pankaj Deshmukh.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ३ फेब्रुवारी, २०२०



अलंकार पोलिसांनी जप्त केलेल्या सायकली.

# सायकलचोर अटकेत

पुणे : कोथरूड, कर्वेनगर यांसह चंदननगर, दत्तवाडी भागातून महागड्या सायकल चोरणाऱ्या दोन चोरट्यांना अलंकार स्टेशन पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून साडेसात लाख रुपये किमतीच्या पाच सायकली जप्त केल्या आहेत.

मिमोह उर्फ पर्व राजकुमार सोनी (वय २०, रा. शिवराज विद्यामंदिर शाळेजवळ, वडगावशेरी) आणि हिमांशू राजकुमार सोनी (२३) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. अलंकार पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक सूरज गोरे यांना सायलक चोरांची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून दोन्ही आरोपींना अटक केली. त्यांच्या चौकशीत, शहरातील विविध भागांतून आणखी चार सायकली चोरल्याची कबुली त्यांनी दिली. वरिष्ठ पोलिस निरिक्षक कल्पना जाधव, राजेश तटकरे (गुन्हे) पोलिस नाईक बाबूलाल तांदळे, राजेंद्र लांडगे, प्रफुल चव्हाण, योगेश बडगे, किरण राऊत, संदीप धनवटे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २२ फेब्रुवारी, २०२०

# कार चोरणारे दोन चोरटे अटकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे



चाकूचा धाक दाखवून जबरदस्तीने कार चोरून नेणाऱ्या दोघांना कोंढवा पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून वाहनचोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले असून, कार, रिक्षा, दोन दुचाकी असा एक लाख साठ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शाहरूख शौकत खान (वय २५), विशाल नानासाहेब आव्हाड (१९, दोघेही रा. कृष्णनगर, महंमदवाडी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. उंड्री परिसरात १७ फेब्रुवारीला भरदिवसा दुचाकीस्वार चोरट्यांनी चाकूचा धाक दाखवून एक लाख रुपये किमतीची कार चोरुन नेली होती. या प्रकरणी अक्षय खुडे (२५, रा. येवलेवाडी) यांनी कोंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार दुचाकीवरील दोघांविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचा समांतर तपास कोंढवा पोलिस करीत होते. तपास पथकातील ज्योतिबा पवार, अमित साळुंखे यांनी परिसरातील 'सीसीटीव्ही' फुटेज तपासले असता आरोपींपैकी एक जण 'रेकॉर्ड'वरील गुन्हेगार असल्याचे समजले. त्या आरोपीचे फोटो दाखविल्यानंतर तो आव्हाड असून, त्यानेच खानच्या मदतीने कार चोरून नेल्याचे समोर आले. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक विनायक गायकवाड, महादेव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली चेतन मोरे यांच्या पथकाने आव्हाडला पकडले. त्याच्याकडे तपास केल्यानंतर खानलाही अटक करण्यात आली. त्यांनी परिसरात केलेले वाहनचोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले असून, तपास सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले.

## ट्रकच्या धडकेत तरुण ठार

पुणे : भरधाव वेगात आलेल्या ट्रकने दिलेल्या धडकेत पादचारी तरुण ठार झाल्याची घटना दोन दिवसांपूर्वी कोंढव्यातील तालाब मशीदजवळील रस्त्यावर घडली आहे. रफिक शाहदुल्ला शेख (वय २१, रा. कोंढवा बुद्रूक) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी शाहदुल्ला शेख यांनी कोंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. दोन दिवसांपूर्वी रफिक तालाब मशीजवळील मॉलसमोरून जात होता. त्या वेळी पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या मैला वाहून नेणाऱ्या ट्रकचालकाने त्याला धडक दिली. त्यामुळे रफिकचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिस नाईक एच. एन. राउत तपास करीत आहेत.

## क्राइम डायरी

## दीड लाखांचा ऐवज लंपास



घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकुण एक लाख ५७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना नरवीर तानाजी रस्त्यावरील (सिंहगड रोड) सरितानगरी येथे नुकतीच घडली आहे.

या प्रकरणी अजय कुकनुर (वय ६३, रा. सरितानगरी) यांनी दत्तवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यावरून पोलिसांनी अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार अजय खासगी कंपनीतून सेवानिवृत्त झाले असून, कुटुंबासहित दत्तवाडीतील सरितानगरीमध्ये ते राहतात. दोन दिवसांपुर्वी ते कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. त्या वेळी चोरट्यांची त्यांच्या घराचे कुलूप तोडून १० हजारांची रोकड आणि सोन्याचे दागिने असा एकूण एक लाख ५७ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला. या प्रकरणी पोलिस उपनिरीक्षक पी. डी. हजारे तपास करीत आहेत.

---

Sakal Times - 8 February, 2020

# Woman held for stealing gold rings

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** Officials of the Crime Branch Unit II of the city police nabbed a 25-year-old woman for allegedly stealing two gold rings worth Rs 50,000 from a jewelry shop in Camp.

The incident took place on January 20.

The police said the woman who stays in Kothrud was traced to Clover Plaza in Camp on Thursday when she was nabbed.

Police Sub-Inspector Nitin Shinde, who is investigating the case, said initially the woman denied stealing the rings. During interrogation she admitted the crime and was arrested.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २५ फेब्रुवारी, २०२०

# अश्लील व्हिडिओप्रकरणी अटक

## येरवडा परिसरातील प्रकार; पाच गुन्हे उघड



“ रिक्षाचालक आरोपी यश डाडर याच्यावर याआधी येरवडा पोलिस ठाण्यात लहान मुलींचा विनयभंग केल्याप्रकरणी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदानुसार (पोक्सो) गुन्हा दाखल असून, चोरीचाही गुन्हा दाखल आहे. मुंढव्यात एक आणि येरवड्यात दोन महिलांचा विनयभंग केल्याचे असे एकूण सहा गुन्हे त्याने केल्याचे समोर आले आहे.

– युनूस शेख, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, येरवडा पोलिस ठाणे

येरवडा : आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या महिलांना रात्री आणि पहाटेच्या वेळी रस्त्यावर निर्जनस्थळी गाठून त्यांना मोबाइलमधील अश्लील व्हिडिओ दाखवून विनयभंग करणाऱ्या विकृत रिक्षाचालक तरुणाला येरवडा पोलिसांनी सापळा रचून रविवारी पहाटे अटक केली. आरोपी तरुणाने येरवडा भागात दोन अल्पवयीन मुलींची आणि दोन तरुणींचा; तसेच मुंढव्यात एका तरुणीचा विनयभंगाचे केल्याचे चौकशीत समोर आले आहे.

यश दीपक डाडर (वय २३, रा. यशवंतनगर, येरवडा) असे अटक केलेल्या रिक्षाचालक तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी आयटी कंपनीत काम करणाऱ्या महिलेने तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी यश हा रिक्षाचालक असून, अविवाहित आहे. दिवसभर तो रिक्षा चालवायचा आणि रात्री दुचाकीवर उच्चभ्रू परिसरात गस्त घालून आयटी कंपन्यांत काम करणाऱ्या महिलांना रस्त्यावर गाठायचा आणि मोबाइलमधील अश्लील व्हिडिओ जबरदस्तीने दाखवून विनयभंग करायचा. काही दिवसांपूर्वी आरोपी दुचाकीवरून पहाटेच्या वेळी कल्याणीनगर भागात गस्त घालत होता. त्या वेळी 'आयटी' कंपनीत काम करणारी महिला कामावरून घरी निघाली होती. महिलेला पाहून आरोपीने तिला रस्त्यात अडवून मोबाइलमधील अश्लील व्हिडिओ दाखवला. दुसऱ्या दिवशी महिलेने पोलिस ठाण्यात विनयभंगाची तक्रार दिली. या दरम्यान आणखी एका 'आयटी' कंपनीतील महिलेनेही तक्रार दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलिस निरीक्षक युनूस शेख यांनी कल्याणीनगर परिसरात सापळा लावला. रविवारी पहाटे आरोपी दुचाकीवर फिरत असताना कल्याणीनगरमधून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे कसून चौकशी केल्यावर त्याने महिलांना अश्लील व्हिडिओ दाखवून विनयभंग केल्याची कबुली दिली.

लोकमत – दि. १९ फेब्रुवारी, २०२०

# आठ गाड्यांची तोडफोड करणारे आरोपी सीसीटीव्हीमुळे जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

सहकारनगर : दत्तवाडीमधील लडकतवाडीमध्ये नुकत्याच जेलमधून बाहेर आलेल्या आरोपीकडून आठ गाड्यांची तोडफोड करण्यात आली. यामध्ये चारचाकी गाड्यांच्या काचा फोडून ५० ते ६० हजार रुपयांचे नुकसान झाले. याबाबत दत्तवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, यातील अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले केले. त्याला हत्यारासोबत ताब्यात घेतले आहे. दुसरा आरोपी अभिषेक येनपुरे ऊर्फ कोक्या हा अजून फरार आहे. याच्यावर गुन्हेदाखल असून हा नुकताच जेलमधून सुटला असून त्याने दहशत निर्माण करण्यासाठी हे कृत्य केले असून तेथील स्थानिक नागरिकांनी या ठिकाणी पेट्रोलिंग करावे, अशी वारंवार मागणी केली होती. मात्र, पोलिसांनी दुर्लक्ष केल्याने ही घटना घडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये अल्टो, तवेरा, टाटा टेम्पो, रिक्षा, क्रिस्टा अशा आठ गाड्यांची तोडफोड करण्यात आली आहे. घटनास्थळी पोलीस उपायुक्त पौर्णिमा गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त पोमाजी राठोड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र सहाणे हजर होते.

पुढारी – दि. ५ फेब्रुवारी, २०२०

# स्वारगेट येथे पार्क केलेला ट्रक चोरीप्रकरणी एकाला अटक

**पुणे : प्रतिनिधी**

स्वारगेट परिसरात पार्क केलेला ट्रक चोरून नेल्याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली. गणेश महादेव चव्हाण (४०, रा. महेश सांस्कृतिक भवनशेजारी, शिवरायनगर, अप्पर बिबवेवाडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत सुरेंद्र पालसिंग होरा (३८, रा. ईशा एम्पायर, हांडेवाडी रोड, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे.

होरा यांचा ट्रान्सपोर्ट व्यवसाय आहे. त्यांचे शंकरशेठ रोडवरील सरस्वती पेट्रोल पंपाजवळ दुकान आहे. त्यांच्या ट्रकवरील चालक ट्रक टिंबर मार्केट परिसरात व शंकरशेठ रोडवर पार्क करून ठेवत असतात. २९ जानेवारी रोजी सकाळी अकरा ते दुपारी दीड वाजण्याच्या सुमारस त्यांचा ट्रक शंकरशेठ रोडवर पार्क केला असताना तो ट्रक चोरीला गेला होता. या प्रकरणी खडक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिस शिपाई संदीप कांबळे व रोहन खैरे यांना चोरीला गेलेला ट्रक बिबवेवाडी येथील गणेश चव्हाण याने चोरल्याची माहिती मिळाली. तसेच गणेश हा होरा यांच्याकडे पूर्वी चालक म्हणून काम करत असल्याचे व तो सिंहगड गॅरेज चौकात थांबलेला असल्याचे समजले. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक भरत जाधव, पोलिस निरीक्षक गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली चव्हाण याला अटक करण्यात आली. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर त्याने चोरलेला ट्रक अरण्येश्वर येथील गल्लीमध्ये पार्क केल्याचे सांगितले. महिन्यापूर्वी त्याचे आि होरा यांच्याबरोबर शाब्दिक वा झाल्याने तो ट्रक डुप्लीकेट चावी चोरल्याचे त्याने सांगितले. अप्प पोलिस आयुक्त डॉ. संजय शिंदे पोलिस उपायुक्त स्वप्ना गोरे, सहाय पोलिस आयुक्त प्रदिप आफळे यांच्य मार्गदर्शनाखाली खडक पोलि ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भर जाधव, निरीक्षक गुन्हे उत्तम चव्हा गुन्ह्याचे तपास अधिकारी सहाय पोलिस निरीक्षक उमाजी राठोड पोलिस कर्मचारी अजिज बेग, विनो जाधव, गणेश सातपुते, संदीप पाटील राहुल धोत्रे, राकेश क्षीरसागर, समी माळवदकर, संदीप कांबळे, रोह खैर, रवी लोखंडे, योगेश जाधव विशाल जाधव, इम्रान नदाफ यांच्य पथकाने ही कारवाई केली.

# चोरीप्रकरणी दोघींना अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पर्यायी किल्लीने घर उघडून सात लाख ४३ हजारांचे सोन्याचे दागिने व काही रोकड चोरणाऱ्या दोन मोलकरणींना वानवडी पोलिसांनी अटक केली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून त्या घरी कोणी नसताना दागिने व रोकड चोरत असल्याचे समोर आले आहे.

भारती भगवान आसवानी (वय ५३, रा. फातिमानगर, वानवडी) आणि सुवर्णमाला बूथवेल खंडागळे (५९, रा. केशवनगर, मांजरी) असे अटक केलेल्या मोलकरणींची नावे आहेत. या प्रकरणी सपना शाह (३८, रा. वानवडी) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शाह कुटुंबासोबत फातिमानगरमधील ईशा टॉवरमध्ये राहतात. जानेवारी २०१८ पासून त्यांच्याकडे भारती आणि सुवर्णमाला घरकाम करण्यासाठी येत होत्या. घरातील लोक कामानिमित्त बाहेर गेल्यानंतर साफसफाई आणि इतर कामे करण्यासाठी शाह यांनी भारती आणि सुवर्णमाला यांच्याकडे पर्यायी किल्ली दिली होती. त्याचा गैरफायदा घेऊन या दोन मोलकरणींनी शाह यांच्या घरातून जून २०१८ ते फेब्रुवारी २०२० कालावधीत वेळोवेळी रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा सात लाख ४३ हजारांचा ऐवज चोरून नेला. ही गोष्ट शहा यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली होती. पोलिसांनी तपास करून दोघींना अटक केली आहे. या प्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक आसाराम शेटे अधिक तपास करीत आहेत.

## क्राइम डायरी



### दरोड्याच्या तयारीतील टोळीस अटक

नऱ्हे येथील एका सराफावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सात जणांच्या टोळीला सिंहगड रोड पोलिसांनी अटक केली आहे. ग्रँडियर सोसायटीसमोर शनिवारी पहाटे सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

सागर बसवराज नडगिरे (वय १९, रा. वडगाव बुद्रुक), राहुल गंगाराम मरगळे (१९, रा. शिरकुले, हवेली), शुभम सचिन उफाळे (२०, रा. वडगाव), समीर मोहन चांदेकर (२०, रा. धायरी), सागर शरनम रणसौरे (२०, रा. धायरी), हर्षद गणेश जातेगावकर (२१, रा. धायरी), शुभम सुनील चव्हाणे (२१, रा. आंबेगाव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी पोलिस शिपाई दयानंद तेलंगे पाटील यांनी तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड रोड पोलिसांकडून शनिवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास नऱ्हे परिसरात गस्त सुरू होती. त्या वेळी ग्रँडियर सोसायटीसमोरील रस्त्यावर सात जणांचे टोळके संशयास्पदरीत्या फिरत असल्याचे दिसले. पोलिसांनी सागर, राहुल, शुभम, समीर, रणसौरे, हर्षद, चव्हाण यांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे तीन कोयते, मिरची पूड, कटावणी, दोर, बॅटरी, स्क्रू ड्रायव्हर असे साहित्य सापडले. चौकशीत त्यांनी नऱ्हे परिसरातील सराफावर दरोडा घालणार असल्याचे सांगितले. या प्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक चेतन थोरबोले अधिक तपास करीत आहेत.

पुण्यनगरी – दि. २८ फेब्रुवारी, २०२०

# अडीच वर्षांनंतर खुनाच्या गुन्ह्यास फुटली वाचा

## कोंढव्यातील घटना : चोरीच्या प्रकरणातील अटक आरोपीकडून खुलासा

**। पुणे : प्रतिनिधी**

वाहनचोरीच्या गुन्ह्यात अटक केलेल्या आरोपीकडे तपास करीत असताना अडीच वर्षांपूर्वी केलेल्या खुनाच्या गुन्ह्यास वाचा फुटल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. रिक्षातील प्रवाशास निर्जन ठिकाणी घेऊन जात त्याला लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने विरोध केल्याने चौघांनी त्याच्या डोक्यात दगड घालून खून होता. याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे. कोंढव्यातील पारसी मैदानात अडीच वर्षांपूर्वी ऑगस्ट २०१७ मध्ये ही घटना घडली. कोंढवा पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली होती.

इमरान रौफ शेख (वय २०) आणि अहमद आयुब खान (वय २५, दोघे रा. शिवनेरीनगर, गल्ली क्र. ९ कोंढवा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या दोघांसह वसिम अजमल खान (वय ३०) आणि शाहरूख ऊर्फ खड्ड्या नूर हसन खान (वय १९) यांच्याविरोधात गुन्हा दाखल आहे. यातील वसिम खान यास चोरीच्या गुन्ह्यात अटक केली आहे, तर शाहरूख खान याचा मृत्यू झाला आहे. निखिल अनिल लोंढे (वय २४, रा. जांभूळवाडी रोड, बालाजी दर्शन, सिद्धिविनायक सोसायटी, कात्रज) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे.

निखिल लोंढे दि. २८ ऑगस्ट २०१७ रोजी पुणे रेल्वे स्टेशनजवळ बसची वाट पाहत उभा होता. आरोपी अहमद खान याने स्वतःच्या रिक्षामध्ये निखिल लोंढे यास बसवून पडीक जमीन असलेल्या पारसी मैदानात गेले. तेथे आरोपी निखिल याच्याकडील पैसे, तसेच इतर साहित्य जबरदस्तीने काढून घेत असताना त्याने आरोपींना विरोध केला. त्यामुळे आरोपींनी निखिल याच्या डोक्यात दगड मारून त्याचा खून केल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

### असा उघडकीस आला गुन्हा

कोंढवा पोलिसांनी काही दिवसांपूर्वी वाहनचोरी करणाऱ्या आरोपींना अटक केली होती. त्यांच्याकडे सखोल तपास केला असता त्यातील एका आरोपीने पुणे स्टेशन येथून युवकास रिक्षात बसवून कोंढव्यात त्याचा खून केला असे सांगून त्या युवकाजवळील कागदपत्रांची कॅरिबॅग मित्राकडे दिली असल्याची माहिती दिली. पोलिसांनी त्या मित्राचा शोध घेत त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे असलेली कॅरिबॅग हस्तगत केली. त्या कागदपत्रांवरून निखिलच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला असता तो मृतदेह निखिलचा असल्याचे निदर्शनास आले. विश्रांतवाडी पोलिसात निखिल बेपत्ता असल्याची नोंद कुटुंबीयांनी केली होती.

### तत्कालीन अधिकाऱ्याचे तपासाकडे दुर्लक्ष

निखिलचा मृतदेह आढळून आल्यानंतर कोंढवा पोलीस ठाण्यातील तपासाधिकाऱ्यांनी आकस्मित मृत्यू अशी नोंद केली. डोक्यात दगड घालून खून केल्याचे स्पष्ट असतानाही तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांनी या गुन्ह्याचा गांभीर्याने तपास केला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

दैनिक जनप्रवास – दि. ९ फेब्रुवारी, २०२०

# हल्लेखोरांना मरेपर्यंत जन्मठेप : तत्कालीन पोलीस अधिक्षक फुलारींवर अभिनंदनाचा वर्षाव

**सांगली ● प्रतिनिधी**

हिवेरी तिहेरी खूनप्रकरणाचा तत्कालीन पोलीस अधिक्षक सुनिल फुलारी यांनी सखोल तपास करून सुधिर घोरपडे व रविंद्र कदम यांना गजाआड केले, फुलारी यांनी भक्कम पुरावे गोळा केले , व या खूनप्रकरणातील हल्लेखोरांना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी होवू लागल्यानंतर तातडीने या खटल्याकामी सरकारपक्षातर्फे अ‍ॅड. उज्वल कदम यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी करणारे पत्र शासनाला पाठविले. या तिहेरी खूनप्रकरणातील हल्लेखोरांना मरेपर्यंत जन्मठेप झाल्यामुळे तत्कालीन पोलीस अधिक्षक सुनिल फुलारी यांचेवर जिल्ह्यातूद अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## हिवरे तिहेरी खूनप्रकरण

हिवरे (ता. खानापूर) येथे २१ जून २०१५ रोजी कौटुंबिक कारणावरून प्रभावती शिंदे, सुनीता पाटील, निशिगंधा शिंदे या तीन महिलांची हत्या करण्यात आली . सदरचा खून हा कोल्ड माइंडेड होता. त्यामुळे सदर खुनाच्या तपासाचे आव्हान सांगली पोलीस दल व विटा पोलिसांसमोर होते , तत्कालीन पोलीस अधीक्षक सुनील फुलारी व अप्पर पोलीस अधीक्षक लक्ष्मीकांत पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी करून पोलीस उपअधिक्षक अभिजित पाटील यांनी आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले होते. या खूनप्रकरणी पोलिसांनी सुधीर घोरपडे व रविंद्र कदम यांना अटक केली. वेळोवेळी पोलीस अधिक्षक फुलारी यांचे मार्गदर्शन असल्यामुळे या खुनाचे दोषारोपपत्र वेळेत दाखल झाले व सखोल तपास झाला. त्यावेळी हिवरे गावातील सर्व ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षक सुनील फुलारी यांची भेट घेऊन या खूनप्रकरणी सरकार पक्षाच्यावतीने अ‍ॅड. उज्वल निकम यांनी खटला चालवावा, अशी मागणी केल्यानंतर पोलीस प्रशासनाच्या वतीने तत्कालीन पोलीस अधीक्षक सुनील फुलारी यांनी तत्काळ सरकारला पत्र पाठवून अ‍ॅड. उज्वल निकम यांच्या नियुक्तीची विनंती केली होती. सरकारतर्फे अ‍ॅड. उज्वल निकम यांनी खटला चालविला आणि सत्र न्यायाधीश डी. पी. सातवलेकर यांनी दोन्ही आरोपींना मरेपर्यंत कारावासाची शिक्षा सुनावली. आरोपींना मरेपर्यंत जनमठेपेची शिक्षा झाल्याने तत्कालीन पोलीस अधीक्षक सुनील फुलारी यांचे अभिनंदन केले जात आहे.



सुनिल फुलारी